



अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर


सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | रविवार, दि. १५ ऑक्टोबर २०२३ | ▶ वर्ष : २२ वे ▶ अंक : १७ वा ▶ किंमत : ५ रुपये ▶ पाने ८


## सलगर येथे विष प्राशन ; उपचारादरम्यान मृत्यू

✔ **सोलापूर** : सलगर (ता.अक्कलकोट) येथे विषारी द्रव प्राशन केलेला रमेश अप्पाराव शेळके (वय ३५) हा सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना आज शनिवारी पहाटे मरण पावला. तो ६ ऑक्टोबर रोजी सायंकाळच्या सुमारात राहत्या घरात विष प्राशन केला होता. त्याला अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून अशोक (भाऊ) यांनी सोलापुरात दाखल केले होते. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली असून आत्महत्येचे कारण समजले नाही.

# विश्वकप: भारताचा पाकवर विजय 'अष्टमी'



✔ अहमदाबाद

**विश्वचषक २०२३ मध्ये शनिवारी भारताने पारंपारिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानवर ७ गडी राखत दणदणीत विजय मिळवला. या विजयाने भारताने विश्वचषकात पाकचा सलग ८ वा पराभव विजया अष्टमी साजरी केली. रोमहर्षक सामन्याची अपेक्षा असताना यजमान भारतीय संघाने पाकिस्तानला या सामन्यात डोके वर काढू दिले नाही. गेल्या सामन्यातील शतकवीर कर्णधार रोहित शर्मा याही सामन्यात चमकला. त्याने ६ षटकारांसह ८५ धावा करत संघाला विजय मिळवून दिला.या विजयासह भारतीय संघाने सलग तीन विजय पूर्ण केले.**

अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर भारताचा कर्णधार रोहित शर्माने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पाकिस्तानचा संघ ४२.५ षटकांत १९१ धावांवर गारद झाला. प्रत्युत्तरात भारताने ३०.३ षटकांत ३ गडी गमावत १९२ धावा करून सामना जिंकला. टीम इंडियाने विश्वचषकाच्या इतिहासात पाकिस्तानविरुद्धची विजयी मालिका सुरू ठेवली.

पाकिस्तानकडून मिळालेल्या १९२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या भारतीय संघाची सुरुवात खराब झाली. डेंग्यूमधून बरा झालेला शुबमन गिल ११ चेंडूत चार चौकारांसह १६ धावा करून बाद झाला. तो बाद झाल्यानंतर विराट कोहली क्रीजवर आला. कोहलीने रोहितसोबत दुसऱ्या विकेटसाठी ५६ धावांची भागीदारी केली. पाकिस्तानविरुद्ध सहसा मोठी खेळी खेळणारा विराट या सामन्यात विशेष काही करू शकला नाही. त्यानने १८ चेंडूत तीन चौकारांच्या मदतीने १६ धावा केल्या. त्याच्यानंतर श्रेयस अय्यरने कर्णधार रोहित शर्मासोबत तिसऱ्या विकेटसाठी ७७ धावांची भागीदारी केली. शर्मा ८५ धावांवर बाद झाला. अय्यरने ६२ चेंडूत नाबाद ५३ धावा केल्या. के.एल. राहुलने २९ चेंडूत नाबाद १९ धावा केल्या. या जोडीने सामना जिंकून दिला.

### रोहितने षटकारांचा पाऊस पाडला

रोहित शर्माला सलग दुसऱ्या सामन्यात शतक झळकावता आले नाही. अफगाणिस्तानविरुद्ध त्याने १३१ धावांची खेळी केली होती. या सामन्यातही त्याला शतक झळकावण्याची संधी होती, मात्र त्याला तसे करता आले नाही. रोहितने ६३ चेंडूत ८६ धावा केल्या. त्याने आपल्या खेळीत ६ चौकार आणि ६ षटकार मारले. रोहितने एकदिवसीय क्रिकेटमध्ये ३०० षटकारही पूर्ण केले. पाकिस्तानचा माजी कर्णधार शाहिद आफ्रिदी आणि वेस्ट इंडिजचा माजी सलामीवीर ख्रिस गेल यांच्यानंतर अशी कामगिरी करणारा तो तिसरा फलंदाज ठरला.

## 'हीटमॅन' पुन्हा चमकला ; मालिकेतील सलग तिसरा विजय



### पाकचा १९१ धावांवर खुर्दा

भारतीय गोलंदाजांच्या माऱ्यासमोर पाकचा केवळ १९१ धावात खुर्दा झाला. पाकिस्तानकडून कर्णधार बाबर आझमने सर्वाधिक ५० धावा केल्या. गेल्या सामन्यात शतक झळकावणाऱ्या मोहम्मद रिझवानचे यावेळी अर्धशतक हुकले. तो ४९ धावांवर पॅव्हेलियनमध्ये परतला. इमाम उल हकने ३६, अब्दुल्ला शफीकने २० आणि हसन अलीने १२ धावा केल्या. भारताकडून जसप्रित बुमराह, मोहंमद सिराज, कुलदीप यादव, रविंद्र जडेजा आणि हार्दीक पांड्या यांनी प्रत्येकी दोन विकेट घेतल्या. पाकच्या सहा फलंदाजांना दुहेरी आकडा गाठता आला नाही.

### भारतीय संघ गुणतालिकेत अव्वल

या विजयाने विश्वकप स्पर्धेत भारताने पाकिस्तानविरुद्धची अपराजित मालिका ८–० अशी कायम राखली. भारताचा हा चालू विश्वकपमधील सलग तिसरा विजय ठरला. या विजयासोबत भारतीय संघ गुणतालिकेत अव्वल स्थानी पोहोचला. दुसऱ्या क्रमांकावर तीन विजयासह न्यूझिलंडचा संघ आहे. भारताचा चौथा सामना १७ मार्च रोजी पुणे येथे बांगलादेशसोबत होणार आहे.

## दामाजी महाविद्यालयाच्या अध्यक्षांसह चौघांविरुद्ध गुन्हा

### बनावट कागदपत्राद्वारे फसवणूक

✔ सुराज्य/सोलापूर

बनावट स्वाक्षऱ्या आणि खोटे कागदपत्रे धर्मादाय आयुक्तालयात सादर करून संस्थेच्या अध्यक्षपदी निवड करून शासन,धर्मदाय आयुक्त आणि संस्थेची फसवणूक केल्याप्रकरणी मंगळवेढा येथील दामाजी महाविद्यालयाचे अध्यक्ष यांच्यासह चौघाविरुद्ध मंगळवेढा पोलिसांनी नुकताच फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

या संदर्भात संस्थेचे सचिव रमेश दीनानाथ जोशी (वय ६९ रा.किल्लाभाग, मंगळवेढा) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे मंगळवेढाच्या पोलिसांनी संस्थेच्या अध्यक्षा शुभदा सुभाष शहा, त्यांचा मुलगा राहुल सुभाष शहा (दोघे रा. चोखामेळा चौक), बाळासाहेब उर्फ भीमराव विठ्ठल पाटील (उपाध्यक्ष रा. बोराळे) आणि किसन जगन्नाथ गवळी (सर्व रा.मंगळवेढा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या चौघांनी मिळून १७ ऑगस्ट २०२१ ते २० जून २०२३ या दरम्यान आपले तसेच डॉ.अशोक सुरवसे यांच्या बनावट सहया केलेले चेंज रिपोर्ट आणी खोटे कागदपत्रे सादर करून अध्यक्ष आणि इतर सदस्याची निवड केली. असे जोशी यांच्या फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास सहाय्यक निरीक्षक पिंगळे करीत आहेत.

## माळशिरस येथे विवाहितेचे मंगळसूत्र हिसकावले

✔ सुराज्य/सोलापूर

रस्त्यावरून पायी जाणाऱ्या एका विवाहितेच्या गळ्यातील १० ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र दोघा चोरट्याने हिसका मारून तोडून पोबारा केला. ही जबरी चोरीची घटना माळशिरस येथील अड्डावन्न फाटा येथे शुक्रवारी घडली.

यासंदर्भात अनिता विशालराज वाघमोडे (रा. खंडोबावस्ती) यांनी फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी दोघा अनोळखी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. अनिता वाघमोडे या अड्डावन्नफाटा येथील खंडोबावस्ती रोडवरून पायी निघाल्या होत्या. त्यावेळी दोघा चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील ४८ हजार रुपये किमतीचे मंगळसूत्र पळवून नेले. अशी नोंद पोलिसात झाली. सहाय्यक निरीक्षक घोलकर करीत आहेत.

## दहा दिवसात आरक्षण न दिल्यास पुढे काय होईल सांगता येणार नाही

### ▶▶ जरांगे-पाटील यांचा सरकारला इशारा

### ▶▶ अंतरवाली सराटीच्या सभेत लाखोंची गर्दी

✔ सुराज्य/जालना

मराठा समाज एक होत नाही, असं बोलणाऱ्यांच्या आज इथे जमलेल्या गर्दीने मुस्काटात मारली आहे. हा मराठा समाजासाठी सुवर्णक्षण आहे. मराठा आरक्षणासंदर्भात निर्णय घेण्यासाठी आपण राज्य सरकारला ४० दिवसांची मुदत दिली होती. या काळात एका शब्दाने आम्ही सरकारला काही विचारले नाही. मराठा समाज आपल्या शब्दावर ठाम राहिला. आता हा निर्णय घेण्यासाठी फक्त १० दिवस शिल्लक राहिले आहेत. त्यानंतर सरकारने मराठा समाजाला आरक्षण दिले नाही तर पुढे काय होईल, हे आम्ही सांगू शकत नाही आरक्षण घेतल्याशिवाय शांत बसणार नाही, असेही मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले.

मनोज जरांगे यांच्या शनिवारच्या सभेसाठी अंतरवाली सराटी येथे राज्यभरातून लाखो मराठा बांधवांनी मोठी गर्दी केली होती. सभेचे व्यासपीठ हे गर्दीच्या मधोमध उभारण्यात आले होते. मनोज जरांगे पाटील यांनी आपल्या भाषणात मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्यांवर आक्रमकपणे टीका केली.

मराठा समाजाला ओबीसी कोट्यातून आरक्षण देण्यात यावे. राज्यातील मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे. त्यासाठी ओबीसी प्रवर्गातील प्रगत जाती बाहेर काढाव्यात, अशी मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केली. आपल्या भाषणाच्या सुरुवातीला मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाच्या प्रमुख मागण्या पुन्हा एकदा तपशीलवार मांडल्या. मराठा समाजाला ५० टक्क्यांच्या मर्यादेत राहून आरक्षण दिले तर वेगळा प्रवर्ग करुन ते द्यावे. ते एनटी, व्हीजेएनटी प्रवर्गाप्रमाणेच टिकणारं आरक्षण हवे. अन्यथा आम्ही ते आरक्षण घेणार नाही, असे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले.

(अधिक वृत्त पान २ वर)



### ... माझी अंतयात्रा निघणार

२३ ऑक्टोबरच्या आत मराठ्यांना आरक्षण दिलं नाही, तर मी एवढं टोकाचं उपोषण करणार की यामुळे एकतर माझी अंतयात्रा निघणार किंवा मराठ्यांच्या आरक्षणाची विजयीयात्रा निघेल असा इशारा जरांगे पाटील यांनी दिला.

## लक्ष्मी टाकळीत घरफोडी; ७३ हजारांचा ऐवज गायब

✔ सुराज्य/सोलापूर

लक्ष्मी टाकळी (ता.पंढरपूर) येथे राहणाऱ्या बाळू महादेव घोलप यांच्या बंद घराची कडीकोयंडा उचकटून चोरट्याने कपाटातील रोख ७ हजार रुपये आणि १३ ग्रॅम सोन्याचे दागिने असा एकूण ७३ हजाराचा ऐवज पळविला. ही चोरी ३ ऑक्टोबर रोजी दुपारच्या सुमारास घडली.

यासंदर्भात बाळू घोलप यांनी नुकतीच पंढरपूर तालुका पोलिसात फिर्याद दाखल केली. हवालदार नलावडे पुढील तपास करीत आहेत.

## भवानी पेठेतील दुकानावर धाड; ६८ किलो स्पेशल बर्फी जप्त

✔ सुराज्य/सोलापूर

अन्न प्रशासनाने भवानी पेठेतील एका दुकानावर धाड टाकून स्पेशल बर्फी जप्त केली आहे. दुकानात अस्वच्छता असून अस्वच्छतेच्या ठिकाणी स्पेशल बर्फीची साठवणूक केल्याप्रकरणी अन्न प्रशासनाने ६८ किलो स्पेशल बर्फी तत्काळ जप्त करुन नष्ट केला आहे. याची साधारण किंमत १७ हजार रुपये आहे, अशी माहिती अन्न प्रशासनाचे




सहाय्यक आयुक्त सुनील जिंतूरकर यांनी दिली आहे.

उत्तम जूताराम चौधरी (रा. भवानी पेठ, सोलापूर) यांच्या दुकानावर कारवाई झाली आहे. अन्नसुरक्षा अधिकारी श्रीमती पाटील यांनी ही कारवाई केली आहे. जप्त केलेली बर्फी नष्ट केले. बर्फीचे नमुने पुणे प्रयोगशाळेकडे पाठवले. नमुन्याचा अहवाल आल्यानंतर संबंधितावर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती सुनील जिंतूरकर यांनी दिली.

## वांगी येथे अपघात; तरुणाचा मृत्यू

✔ **सोलापूर** : वडाळा ते पडसाळी रोड वडील वांगी ओढ्या जवळ मोटरसायकलच्या अपघातामध्ये जखमी झालेला प्रतीक संजय गावडे (वय २५ रा.मूर्तिजापूर जि. अकोला) हा उपचारापूर्वी मयत झाला. काल शुक्रवारी दुपारच्या सुमारास हा अपघात घडला होता. त्याला गंभीर अवस्थेत तालुक्याच्या पोलिसांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. मात्र तो उच्चारापूर्वी मयत झाला. अशी नोंद तालुका पोलिसात झाली.हवालदार लोखंडे पुढील तपास करीत आहेत.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




क्रिकेटच्या इन्फेक्शनमुळे वर्ल्डकप फिवर चढलाय, रोज लाईव्ह मॅचेसचे डोस द्या !


कल्याण
459-89-180


# चौरट्यांना पकडण्यासाठी पोलिसांचे फायरिंग; संशयित पसार

## गावठी पिस्टल, चोरीच्या कारसह ३ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

✔ सुराज्य/सोलापूर

**एखाद्या ॲक्शनपॅक्ड चित्रपटातील गोळीबाराच्या प्रसंगाला साजेशी घटना एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत शनिवारी पहाटे घडली. अवघ्या तीन दिवसांपूर्वी सराफी दुकानात तिजोरी साफ केलेले चोरटे पुन्हा दुसऱ्या सोन्याच्या दुकानात चोरीसाठी येणार असल्याची खबर मिळाल्यानंतर गुन्हे प्रकटीकरण पथकाने रचलेल्या सापळ्यात ते अडकण्यापूर्वीच तिन्ही संशयीतांनी घटनास्थळावरून काढता पाय घेतला. कारमधील चोरट्याला पकडण्यासाठी पोलिसांनी फायरिंग केली. टायर बस्ट झाले, मात्र चोरटे पळून गेले.**

११ ऑक्टोबरच्या रात्री निलम नगरातील बालाजी ज्वेलर्स दुकानाची घरफोडी चोरी करुन पळालेल्या चोरांनी सोलापुरातील कार चोरुन ती अविनाश नगर जवळील कोंड्याल शाळेजवळील लावली आहे, त्या कारमधून पिस्टलसुध्दा आहे, अशी खबर होती. एमआयडीसी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजन माने यांनी गुन्हे प्रकटीकरण पथक प्रमुख पोसई विक्रम रजपूत यांना दिलेल्या सुचनानुसार गुन्हे प्रकटीकरण पथक हे संशयीतांच्या पाळतीवर होते.

त्यानुसार कोंड्याल शाळेजवळ तीन मजली अर्धवट बांधकाम झालेल्या ठिकाणी संपूर्ण पथकाने तिन्ही बाजुने सापळा लावून ठेवला. मिळालेल्या बातमीनुसार शनिवारी






मध्यरात्री कारच्या दिशेने एका मोटारसायकलवरुन तीन इसम आले. त्यांनी कारजवळ मोटरसायकल लावली. दुचाकीवरील इसमास थांबण्याचा इशारा करताच त्याने जोरात मोटरसायकल चालवून पो.कॉ. अर्जुन यांना कट मारला. खाली पडल्यामुळे ते जखमी झाले.

संशयीत वेगाने उत्तर दिशेने मोटरसायकल घेऊन गेला. दुसरा संशयीत कारमध्ये बसलेला होता. तो कार चालू करुन दक्षिण दिशेला वेगाने निघण्याच्या प्रयत्नात असताना, पो.स.ई. रजपुत यांनी जोरात ओरडून कार थांबवण्यास सांगून देखील चालकाने वाहन न थांबवल्याने त्यांनी त्यांच्याकडील पिस्टलमधून कारच्या चाकाच्या दिशेने दोन राऊंड फायर केले.

एक राउंड कारच्या उजव्या बाजूला मागच्या चाकात लागली. कारमधील संशयीत इसम हा समोरील काटेरी झुडुपामधुन अंधाराचा फायदा घेत तो ही पळून गेला. पोलिसांनी कार आणि पिस्टलसह ०३ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला.

### यांनी केली कामगिरी

ही कामगिरी पोलीस आयुक्त डॉ. राजेंद्र माने, पोलीस उप–आयुक्त परिमंडळ विजय कबाडे, सहा. पोलीस आयुक्त संतोष गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजन माने, पो.नि. शिवशंकर बोंदर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप–निरीक्षक विक्रम रजपुत, पोहेकॉ राकेश पाटील, नाना उबाळे, दिपक डोके, सचिन भांगे, पोना. मंगेश गायकवाड, पो.कॉ. सुहास अर्जुन, शंकर याळगी, काशीनाथ वाघे, दिपक नारायणकर, शैलेश स्वामी, अमोल यादव, आमसिध्द निंबाळ, देवीदास कदम, भारतसिंग तुक्कुवाले यांनी पार पाडली.

# जरांगे यांनी साधला भुजबळ अन् सदावर्तेंवर निशाणा



**सुराज्य/जालना**

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची आंतरवाली सराटी येथे सभा पार पडली. १५० एकरहून अधिक जागेत पार पडलेल्या या सभेला लाखो मराठा कार्यकर्त्यांनी उपस्थिती लावली होती. यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणावरून सरकारला इशारा दिला आहे. तसेच, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री छगन भुजबळ आणि वकील गुणरत्न सदावर्तेंना लक्ष्य केले आहे.

जरांगे पाटील म्हणाले, छगन भुजबळ यांनी पुन्हा त्यांनी आरक्षणाविरोधात उद्गार काढत फडफड केली. सभेला ७ कोटींचा निधी कुठून आला? असा प्रश्न विचारला. मला त्यांना सांगायचंय, माझ्या माय बापाने कापूस विकून १००-५०० जमा केले आणि सभेचा खर्च केला आहे.

लोक तुम्हाला पैसे देत नसतील पण आम्हाला देतात. ज्या गोरगरिब मराठ्याने तुम्हाला मोठं केलं त्यांचंच रक्त पिऊन तुम्ही पैसा कमावला म्हणून तुमच्यावर धाड पडली आणि तुम्ही जेलमध्ये गेलात, अशी बोचरी टीका केली. जरांगे पाटील म्हणाले की, या सभेसाठी आम्ही घामाचा पैसा लावला आहे. जवळपासच्या गोदा पट्ट्यातील १२३ गावांतून हा निधी जमा केला गेला. तसंच, महाराष्ट्रातून या सभेसाठी येणाऱ्या या मराठ्यांची सेवा करण्याचं काम १२३ गावांनी केला आहे. त्यातही १२३ मधून २२ गावांनी पैसे दिले तेच २१ लाख झाले, म्हणून इतर गावांकडून पैसे घेतलेच नाहीत, असं म्हणत जरांगे पाटलांनी संपूर्ण हिशोब दिला.

भुजबळांना वावर घेण्याचं वेड लागलं आहे. लोकांचे पैसे खाण्याची सवय त्यांना आहे. आम्ही ७ कोटी खर्च केले, असं ते ( भुजबळ) म्हणतंय. एवढ्या मोठ्या नेत्यानं असं वक्तव्य करणं अपेक्षित नाही. त्यामुळे अजितदादा त्यांना समज द्या, तुमच्या पक्षातील नेते आहेत ते. नाहीतर मी असा मागे लागेन. त्याला म्हणावं माझ्या नादाला लागू नको, मी कोणाच्या मागे लागलो तर त्याला सोडतच नाही, अशा शब्दांत त्यांनी भुजबळांना सुनावले.

### फडणवीसजी, गुणरत्न सदावर्ते यांना समज द्या

गुणरत्न सदावर्ते यांनी मराठ्यांचे वाटोळ केलं आहे. मराठा आरक्षणाविरोधात सदावर्ते कोर्टात गेले होते. त्यांनी आता मराठा समाजाविरोधात गरळ ओकू नये. सदावर्ते हे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा कार्यकर्ता असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे फडणवीसांनी गुणरत्न सदावर्ते यांना समज द्यावी, असं आवाहन करताना मराठ्यांना अंगावर घेऊ नका, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला.

## संक्षिप्त वृत्त...

### विवाहितेचा छळ; पतीसह पाचजणांवर गुन्हा

**सोलापूर** : तू जाड आहे.लग्नात जास्त हुंडा,सोने, प्रापंचिक सामान दिले नाही.असे घालून पाडून बोलून शारीरिक व मानसिक त्रास देऊन जिवे मारण्याची धमकी दिली तसेच तुझ्या आई-वडिलांकडून मुलांकरिता एक तोळे सोन्याची अंगठी चांदीचे वस्तू घेऊन ये.व तसेच घर बांधकामासाठी पाच लाख रुपये आण असे म्हणून माहेरी सोडून दिल्याप्रकरणी पतीसह पाच जणांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना १३ जुन २०२३ ते ६ ऑगस्ट २०२३ दरम्यान फिर्यादी यांच्या सासरी घडली.याप्रकरणी पिंकी नागेश गायकवाड (वय-३५,रा.सम्राट चौक,न्यू बुधवार पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून पती नागेश गायकवाड,सासू मीनाक्षी गायकवाड,सासरे सुरेश गायकवाड,दीर गणेश गायकवाड जाऊ अर्चना गायकवाड (सर्व. रा.मड्डी वस्ती,भवानी पेठ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार रुपनर हे करीत आहेत.

### मेव्हण्याने भावजीला केली मारहाण

**सोलापूर** : लोकमंगल हॉस्पिटल जवळ फिर्यादी दीपक राजू चव्हाण (वय-३०,रा.विजयनगर) यांचा मेव्हणा दिग्विजय शिंदे व त्यांचा लहान भाऊ यांनी फिर्यादी यांना लोकमंगल हॉस्पिटल येथे बोलावून फिर्यादी याने फोन केल्याच्या कारणावरून शिवीगाळ करून खाली पडून लाथा बुक्क्यांनी मारहाण केली व तसेच निखिल शिंदे याने फिर्यादी यांच्या दगडाने,कमरेवर,डोक्यावर मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.ही घटना ११ ऑक्टोंबर रोजी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास लोकमंगल हॉस्पिटल येथे घडली.याप्रकरणी दीपक चव्हाण यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून दिग्विजय शिंदे (रा.सुनील नगर) व निखिल शिंदे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हवालदार पोळ हे करीत आहेत.

### वकिलास मारहाण; पाचजणांवर गुन्हा

**सोलापूर** : सन २०२० मध्ये राधेशाम सलगर यांची केस चालवण्यासाठी घेतल्याच्या व इरिगेशनच्या जागेच्या कारणावरून फिर्यादी वकील मृणाल चंद्रकांत कांबळे (वय-२८,रा.जमनोत्री अपार्टमेंट,दमानी नगर) यांना खाली पाडून लाथा बुक्क्यांनी मारहाण करून धमकी दिली. त्यानंतर त्यांच्या गळ्यातील एक तोळ्याचे सोन्याचे लॉकेट लखन भंडारे याने ओढून घेतल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. ही घटना १२ ऑक्टोंबर रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास मूकबधिर शाळा दमानी नगर येथे घडली. याप्रकरणी मृणाल कांबळे यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून लखन भंडारे,शिरीष सर्वगोड,किरण गायकवाड,शैलेश सर्वगोड,सर्जेराव पगारे (सर्व.रा.सोलापूर) व इतर चार इसम यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक देशमुख हे करीत आहेत.

### धाक दाखवून दुचाकी पळवली

**सोलापूर** : फिर्यादी आकाश चंद्रकांत कोळी (वय-२३, रा.सिद्धरामेश्वर नगर) यांच्या घराजवळ चार अनोळखी इसमांनी कोयता,चाकू,पिस्टलचा धाक दाखवून त्यांची दुचाकी क्र.एमएच.१३.सीडब्लू.३४८४ हि जबरदस्तीने नेली आहे.याप्रकरणी आकाश कोळी यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून चार अज्ञात इस्मानविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोसई राजपूत हे करीत आहेत.ही घटना १४ ऑक्टोंबर रोजी घडली.

## समाजासाठी अभिजित पाटील सरसावले

### वाहनांसाठी डिझेल तर कार्यकर्त्यांना केली अल्पोपहाराची सोय

**सुराज्य/पंढरपूर**

मराठा समाजाच्या आरक्षण संदर्भात मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवली सराटी येथे भव्य सभा आयोजीत केली होती. त्या सभेसाठी पंढरपूर आणि मंगळवेढा भागातून हजारो कार्यकर्ते गेले होते. त्या कार्यकर्त्यांना लागणाऱ्या वाहनासाठी डिझेलची व्यवस्था धाराशिव येथील धाराशिव साखर कारखान्यावर आणि हजारो कार्यकर्त्यांच्या अल्पोपहाराचीही व्यवस्था राष्ट्रवादी काँग्रेसचे सोलापूर जिल्ह्याचे नेते अभिजीत पाटील यांनी केली होती



धाराशिव साखर कारखाना येथे जरांगे पाटील यांच्या सभेसाठी या भागातून जाणाऱ्या जवळपास ५०हजार कार्यकर्त्यांना चहा नाष्टाची सोय करून दिली होती. पंढरपूर आणि मंगळवेढा तालुक्यातील जवळपास ५३५ गाड्यांना डिझेल टाकून देण्याची भूमिकाही मराठा समाजाचा प्रतिनीधी म्हणून केली आहे. मागील काही वर्षापासून उद्योजक अभिजीत पाटील यांनी समाजकारण करत असताना आता थेट राजकारणात उडी घेतली आहे. त्यांच्याकडे दानत असल्याने राजकारणातही त्यांना मोठ्या प्रमाणात यश येत आहे.

## जिल्ह्यातील सर्व शाळेत आज जागतिक हात धुवा दिन साजरा होणार

**सुराज्य/सोलापूर**

जागतिक हात धुवा दिनाच्या निमित्ताने रविवार, १५ आक्टोबर रोजी जिल्ह्यातील सर्व शाळा, अंगणवाडी व ग्रामपंचायतीमधून जागतिक हात धुवा दिवस साजरा करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांनी दिली.

स्वच्छतेच्या विविध कार्यक्रमांपैकी वैयक्तीक स्वच्छतेसाठी हात धुणे हा एक महत्त्वाचा भाग आहे. जनतेच्या स्वच्छतेविषयी जाणीवा समृध्द होवून सदृढ, निरोगी व आनंददायी जीवनासाठी जागतिक स्तरावर १५ ऑक्टोबर हा दिवस दरवर्षी जागतिक हातधुवा दिन म्हणून साजरा केला जातो. त्याअनुषंगाने जिल्हयातील सर्व शाळा, अंगणवाडी, पंचायत समिती व ग्रामपंचायतीमधून जागतिक हात धुवा दिन साजरा करण्यात येणार आहे.१६ ऑक्टोबर रोजी यानिमित्त हात धुवा या विषयावर निबंध, चित्रकला, रांगोळी, वक्तृत्त्व स्पर्धा आणि पोस्टर तयार करणे अशा विविध प्रकारच्या स्पर्धा घेण्यात याव्यात. ग्रामस्थांना हात धुण्याची प्रात्यक्षिके देऊन हात धुण्याचे फायदे सांगावेत, असे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव यांनी आवाहन यांनी केले आहे.

## पालकमंत्री चंद्रकांत पाटील आजपासून दोन दिवस सोलापुरात; विविध कार्यक्रम

**सुराज्य/सोलापूर**

राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण आणि वस्त्रोद्योग मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील १५ व १६ ऑक्टोबर दोन दिवस सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. रविवारी त्यांचे सायंकळी सोलापूरात आगमन होणार आहे.



रविवार १५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सहा वाजता सोलापूर शासकिय विश्रामगृह येथे आगमन होणार आहे. सात वाजता शासकिय विश्रामगृह येथे नागरिकांच्या भेटीसाठी राखीव सोमवार १६ ऑक्टोबर रोजी सकाळी साडेआ्ठ वाजता ग्रामदैवत रूपाभवानी मंदिर येथे देवी दर्शन, सकाळी नऊ वाजता भेट बसावारुढ महास्वामीजी मठास सदिच्छा भेट सकाळी ११ वाजता नियोजन भवन येथे आगमन व जिल्हा वार्षिक योजना आढावा, जिल्हा परिषद यंत्रणेच्या बैठक, दुपारी १२.३० वाजता जिल्हा वार्षिक आढावा, महानगरपालिका व नगर पालिका यंत्रणेच्या बैठक, दुपारी दीड वाजता सुधारीत पंढरपूर विकास आराखडा आढावा बैठक, दुपारी अडीच वाजता जिल्हा वार्षिक योजना आढावा, दुपारी चार वाजता उजनी प्रकल्प आढावा बैठक, दुपारी साडेचार वाजता सोलापूर महापालिका येथे आगमन व आढावा बैठक. रात्री साडेदहा वाजता सोलापूर रेल्वे स्थानक येथून सिध्देश्वर एक्सप्रेसने मुंबईकडे रवाना असा त्यांचा कार्यक्रम आहे.

## श्रीक्षेत्र मार्डी येथील यमाई देवी नवरात्रोत्सवास आजपासून प्रारंभ

**सुराज्य/उत्तर सोलापूर**

सव्वा आठशे वर्षांची परंपरा असलेल्या उत्तर सोलापूर तालुक्यातील श्रीक्षेत्र मार्डी येथील श्री यमाई देवीच्या नवरात्रोत्सवास रविवार दिनांक १५ पासून सुरुवात होत आहे.



रविवारी सकाळी नऊ वाजता देवीची पूजा होईल. त्यानंतर घटस्थापना होणार आहे. नवरात्र उत्सव काळात दररोज पहाटे चार वाजता महापूजा, सकाळी नऊ वाजता नित्य पूजा, रात्री आठ वाजता शेजारती असे नित्य उपचार होतात. यंदा नऊ माळा आले असून गुरुवारी (दि.१९) रोजी ललिता पंचमी आहे. या दिवशी देवीची विशेष पूजा केली जाते. ललिता पंचमीपासून घट उठेपर्यंत गावातील भाविक श्री यमाई देवीच्या मंदिरात वास्तव्यास जातात व त्या ठिकाणी देवीची आराधना करतात. रविवारी (दि.२२) दुपारी आद्य देवी भक्त श्री रंगनाथ स्वामी मोकाशी यांनी स्थापन केलेल्या श्री रेणुकादेवी मंदिरात नवचंडी होम होतो. तर रविवारी रात्री अकरा वाजता श्री यमाई देवीच्या मंदिरातील नवचंडी होमाला सुरुवात होते. सोमवारी (दि.२३) खंडे नवमी असून रविवारी उत्तर रात्री म्हणजे उजाडता सोमवारी यमाई देवीच्या मंदिरातील नवरात्रोतथापन (नववी माळ घालून घट उठविले जाणार आहेत.) होईल. नवरात्र उत्सव काळात भाविकांची देवीच्या दर्शनासाठी मोठी गर्दी असते. मंगळवारी (दि.२४) विजयादशमी असून सायंकाळी सात वाजता श्री यमाई देवीच्या उत्सव मूर्तीची व पादुकांची पालखी मिरवणूक निघणार आहे.

## पूर परिस्थिती टाळण्यासाठी प्रशासनाचे निर्देश

**सुराज्य/सोलापूर**

आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत सोलापूर जिल्हातील काही नदीमधिल पुर परिस्थिती टाळण्यासाठी ७४ हजार वाळू उपसा करण्याचा निर्णय जिल्हाप्रशासनाच्या वतीने घेण्यात आला आहे. यामध्ये सहा तालुक्यतील नद्याचे नियोजन आहे. यांचा प्रस्ताव जिल्हाप्रशासनाकडून जलसंपदा विभागास नदीपात्रातील काही गट स्थळ निश्चित करण्यासाठी सादर केला आहे.

जिल्हा आपत्ती व्यवसायन प्राधिकरणाची बैठक झाली. जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. या बैठकीत अधीक्षक अभियंता लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाच्या प्राप्त पत्रा नुसार दक्षिण सोलापूर तालुक्यातील मौजे चिंचपूर, अक्कलकोट मधील मौजे गुडेवाडी, मंगळवेढा मधील आरळी, मोहोळ येथील माजे घोडेश्वर, माढा तालुक्यातील शेवरे , मिटकलवाडी, तसेच पंढरपुर तालुक्यातील देगाव येथील नदी पात्रातील साधारण ७३ हजार ७४५ ब्रास गाळमिश्रीत बाळू काढून नदीपात्र पूर्ववत करुन पूराचा धोका कमी करणेच्या



दृष्टीने प्रस्ताव सादर केलेला आहे.

शासन निर्णयान्वये राज्यातील नागरिकांना माफक दरात वाळू उपलब्ध व्हावी तसेच अवैध वाळु उत्खनन वाहतुकीस प्रतिबंध करणेकामी शासनामार्फत वाळु उत्खनन व विक्री याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. मधील तरतुदीनुसार आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत राज्यातील पुर परिस्थितीचा धोका कमी करणे, नदीचा प्रवाह पूर्ववत करणे , सुरळीत करणे यासारख्या बाबीसाठी जलसंपदा विभागाने नदीपात्रातील काही गट स्थळ निश्चित केल्यास अशा ठिकाणाहून गाळ, गाळमिश्रीत वाळू काढण्याबाबत तरतुद असल्याने यानुसार आवश्यक पुढील कार्यवाही करण्याचा प्रस्ताव जिल्हाप्रशासनाचा आहे.







# ऐन नवरात्रोत्सवामध्ये कारंजा चौकातील रस्ता खोदला

## देवीभक्तांची वाट झाली खडतर; प्रशासनाच्या आडमुठ्या धोरणावर संताप

सुराज्य/अक्कलकोट

**ऐन नवरात्रोत्सवामध्ये कारंजा चौक परिसरातील रस्ता खोदला. नगरपरिषदेच्या आडमुठ्या धोरणामुळे भक्तांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.**

नवरात्रोत्सवानिमित्त देवी दर्शनासाठी पहाटेपासून भाविक भक्त खासकरून महिलावर्गांची रस्त्यावर मोठी गर्दी असते. हा खोदलेला रस्ता कारंजा चौक मार्गे बुधवार पेठ येथहल अंबाबाई या जागृत देवस्थानाकडे जातो. कारंजा चौकातूनच पुढे बस स्थानकासमोरील यल्लम्मा देवी दर्शनासाठी भक्तांची गर्दी असते.

कारंजा चौक येथे देवीची प्रतिष्ठापना केली जाते. येथील नयनरम्य विद्युत रोषणाई पाहण्यासाठी प्रचंड गर्दी असते. शहरातील सर्वात मोठा गजबजलेला आणि व्यापारीदृष्ट्या महत्त्वाचे केंद्र आहे. असे असताना नगरपरिषदेने कामासाठी रस्ता खोदला. वास्तविक पाहता नवरात्र अगोदर किंवा नंतर हे काम करता आले असते. प्रशासनाच्या आडमुठेपणामुळे भक्तांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. याच मार्गावर संस्थान कालीन अंबाबाई मंदिर, समाधी मठ आहे. याशिवाय मल्लिकार्जुन नवरात्र मंडळाने भव्य देखावा साकारला आहे. असे असताना रस्ता खोदल्याने भक्तांना मोठा त्रास होणार आहे. भल्या पहाटे महिला मोठ्या संख्येने दर्शन परिक्रमा करतात. तर नवरात्र कालावधीमध्ये युवकांची दुर्गामाता दौड असते.

या सर्व गदारोळात छोटी मोठी वाहने, एसटी बस, ट्रकसह इतर वाहनांची वाहतूक कोंडी होईल. दुर्दैवाने अपघात झाला तर याला जबाबदार कोण? असा संतप्त सवाल केला जात आहे.नगरपरिषदेचा आडमुठेपणा नागरिकांच्या जीवावर उठला आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### माळशिरसमध्ये आर्ट ऑफ लिव्हींगचे सात दिवसीय युवा नेतृत्त्व प्रशिक्षण सुरु

**पिलीव** : माळशिरस येथील आर्ट ऑफ लिव्हींग आश्रममध्ये सात दिवशीय युवा नेतृत्त्व प्रशिक्षण कार्यक्रम सुरु आहे. यासाठी संस्कृती रामभाऊ सातपुते यांनी युवक युवतींशी युवा नेतृत्त्व व युवकांमधील गुण, प्रेरणात्मक गोष्टी या विषयांवर संवाद साधून मार्गदर्शन केले. यावेळी बापू ठवरे, सुहास स्वामी, वळकुंदे, डॉ.चव्हाण, नानासाहेब रोकडे, होळकुंडे उपस्थित होते. यासाठी सत्यवान यांच्यासह इतर स्वयंसेवकांनी स्वयंस्फुर्तीने सेवा केली. यामध्ये सुदर्शन क्रिया, योगा, प्राणायाम, सत्संग असा नित्यक्रम आनंदी व उत्साही वातावरणामध्ये सुरु आहे.

### वीज कर्मचाऱ्यास मारहाण; गुन्हा दाखल

**सोलापूर** : औद्योगिक वसाहत वीज कार्यालय येथे वीज कर्मचारी यांना लाईट केव्हा येणार याबाबत फिर्यादी संजय धोंडूसिंग कोल्हापुरे (वय-२९,रा.महाराणा प्रताप नगर) यांना विचारणा केली असता,तेथील कर्मचारी शेख नावाच्या व्यक्तीने फिर्यादीस थांब तुला दाखवतो अशी धमकी देऊन लाकडी बांबूने मारहाण करून दुखापत केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.ही घटना ११ ऑक्टोंबर रोजी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास औद्योगिक वसाहत वीज कार्यालय सोलापूर येथे घडली.याप्रकरणी संजय कोल्हापूर यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून शेख (पूर्ण नाव पत्ता माहित नाही) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस नाईक सुरवसे हे करीत आहेत.

### विवाहितेला सोन्यासह पैशाची मागणी; तिघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर** : विवाहिता ही सासरी नांदत असताना सासरच्या मंडळींनी मिळून शारीरिक व मानसिक त्रास देऊन वारंवार सोन्याची व पैशाची मागणी करून शिवीगाळ करत दमदाटी करून मारहाण केली आहे.ही घटना एप्रिल २०२३ ते ४ ऑगस्ट २०२३ दरम्यान फिर्यादी यांच्या सासरी घडली.याप्रकरणी प्रगती जितेंद्र कांबळे (वय-२१,रा.कमला नगर,विजापूर रोड) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून पती जितेंद्र कांबळे,सासू केशरबाई कांबळे,सुभाष कांबळे (सर्व.रा.जय मल्हार चौक,बुधवार पेठ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास सहायक फौजदार शेख हे करीत आहेत.

### गर्दीचा फायदा घेऊन चोरट्याने पळवला मोबाईल

**सोलापूर** : टिळक चौक ते मधला मारुती दरम्यान अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेत नकळतपणे एका महिलेचा १९ हजार रुपये किमतीचा महागडा मोबाईल चोरून नेला आहे.ही घटना १३ ऑक्टोबर रोजी दुपारी दीड ते दोन वाजण्याच्या दरम्यान टिळक चौक ते मधला मारुती दरम्यान घडली.याप्रकरणी आश्विनी विकास रुपनर (वय-२७,साठे शिंदे वस्ती,डोणगाव रोड) यांनी जोडभावी पेठ) पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरडाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे पुढील तपास पोलीस हवालदार आरेनवरु हे करीत आहेत.

### माणिक पाटील यांचे निधन



**अक्कलकोट** : तोरणी ग्रामपंचायतीचे माजी पोलीस पाटील माणिक घाळेप्पा पाटील यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७३ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. शुक्रवारी त्यांच्या पार्थिवावर त्यांच्या शेतमळ्यात अंत्यसंस्कार करण्यात आले.

## ठोकळ प्रशालेतील विद्यार्थ्यांची मुख्य पोस्ट ऑफीसला क्षेत्र भेट

सुराज्य/सोलापूर




श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयातील नववीच्या विद्यार्थ्यांनी सोलापूर मुख्य पोस्ट ऑफिसला क्षेत्रभेट दिली. यामध्ये ९७ विद्यार्थी सहभागी होते. विद्यार्थ्यांनी पोस्ट ऑफिसमधील सर्व कार्यालयीन कामकाजासह पत्राचे वर्गीकरण कसे करतात, याची माहिती जाणून घेतली. यासाठी मुख्य पोस्ट ऑफिसचे अधिकारी कुलकर्णी, सीनियर पोस्ट मास्टर पवार, सागर दुभाळकर, श्रीकांत जाधव यांनी मार्गदर्शन केले.

नववीतील तनिष्का वाघमारे आणि समर्थ माने यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी सहशिक्षक अर्जुन सुरवसे, सुरज पवार, सहशिक्षिका पूनम चव्हाण उपस्थित होते. यासाठी प्राचार्य दत्तात्रय गाजरे यांचे मार्गदर्शन लाभले.

या उपक्रमाचे संस्थापक अध्यक्षा निर्मला ठोकळ, अध्यक्ष ॲड. वीपिन ठोकळ, उपाध्यक्ष सचिन ठोकळ, सचिव भिकाजी गाजरे, संचालिका शिल्पा ठोकळ, प्राचार्य डी. डी. गाजरे यांनी कौतुक केले.

## संवाद साधणे तणावमुक्तीचे सर्वात मोठे साधन : तांबारे

सुराज्य/बार्शी

मोबाईलच्या व्यसनापासून दूर रहा, असा सल्ला देत बोलणे हे तणावमुक्तीचे सर्वात मोठे साधन आहे, असे प्रतिपादन डॉ. संदीप तांबारे यांनी केले.

जिल्हा समाज कल्याण विभाग, आयुष इन्स्टिट्यूट फॉर एडिक्शन मॅनेजमेंट, बार्शी यांच्या विद्यमाने मानसिक आरोग्य दिनानिमित्त आयोजित तणाव व्यवस्थापन आणि व्यसनमुक्ती या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांच्या मार्गदर्शनानुसार जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुनील खमितकर यांच्या उपस्थितीत यशवंतराव चव्हाण सभागृहामध्ये तणाव मुक्तीचा कार्यक्रम झाला.

मानसोपचार तज्ज्ञ मृणालिनी मोरे, डॉ. तनुजा चिकणे ,जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुनील खमितकर, अविनाश गोडसे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

झुम्बा डान्स थेरपीमध्ये सर्वांनी सहभाग नोंदविला. सूत्रसंचालन विस्ताराधिकारी सुहास गुरव, आभार प्रदर्शन सच्चिदानंद बांगर यांनी केले. यासाठी मोनिका हिरेमठ, नीलिमा ढाळजी, स्वाती गायकवाड, शशीकला सुतार, गंगाबाई राठोड, कमलाकर तिकटे, साहेबगौडा पाटील, बाळासाहेब बिराजदार, बसवराज जेऊरे, सुरेश इटकर यांनी परीश्रम घेतले.

## फॅबटेकमध्ये टेक्नो फॅब स्पर्धेचे आयोजन

सुराज्य/सांगोला




फॅबटेक पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये राष्ट्रीय स्तरावरील टेक्नो फॅब-२०२३ या स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धे साठी विविध पॉलिटेक्निक कॉलेजमधून मोठ्या प्रमाणात विद्यार्थी सहभाग नोंदवणार असल्याची माहिती संचालक डॉ.डी.एस. बाडकर यांनी दिली.

सदर स्पर्धा शनिवार, दि. २१ ऑक्टोबर रोजी होणार आहे. टेक्निकल क्वीझ, इनोव्हेटिव्ह प्रोजेक्ट आयडिया, पोस्टर प्रेझेंटेशन व मॉडेल मेकिंग स्पर्धेचे डिप्लोमा मेकॅनिकल, सिव्हिल, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभाग, सायन्स क्विझच्या प्रथम वर्षातील सर्व विद्यार्थ्यांसाठी आयोजन केले आहे. रोबो रेस स्पर्धा सर्व विभागातील विद्यार्थ्यांसाठी असून, सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयामधील डिप्लोमा शिकत असलेल्या विद्यार्थ्यांनी मोठ्या संखेने सहभाग नोंदविण्याचे आवाहन पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ.शरद पवार यांनी केले आहे. या स्पर्धेसाठी संस्थेचे चेअरमन भाऊसाहेब रुपनर, व्यवस्थापकीय संचालक डॉ.अमित रुपनर कार्यकारी संचालक दिनेश रुपनर, कॅम्पस डायरेक्टर डॉ. संजय आदाटे, डिग्री अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ.आर.बी.शेंडगे यांचे मार्गदर्शन लाभल आहे. या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी समन्वयक प्रा.अजयकुमार भोसले (८०१३१२१९८८) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

## जिल्हा नागरी बँक्स् असोसिएशनला बँकिंग फ्रंटीअर्सचा राष्ट्रीय पुरस्कार

सुराज्य/सोलापूर



सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असोसिएशनला बँकिंग फ्रंटीअर्सचा बेस्ट कलेक्शन अँड रिकव्हरी ट्रेनिंगचा राष्ट्रीय पातळीवरील सन -२०२३ चा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळाल्याची माहिती नागरी बँक्स असोसिएशनचे चेअरमन अशोक लुणावत यांनी दिली आहे.

गोवा येथे नुकतीच देशातील ४०० नागरी बँकांची दोन दिवसीय राष्ट्रीय सहकारी परिषद पार पडली. यावेळी गोव्याचे सहकार मंत्री सुभाष शिरोडकर यांच्या हस्ते हा मानाचा पुरस्कार नागरी बँक्स असोसिएशनचे चेअरमन अशोक लुणावत व संचालक दीनकर देशमुख यांनी स्वीकारला.

या परिषदेमध्ये वित्त आणि जोखीम व्यवस्थापनाचे पुनरुज्जीवन, पायाभूत सुविधांना ऊर्जा आणि ऑप्टिमाईझ करणे, व्यवसाय लँडस्केप, ट्रिलियनच्या दिशेने क्षेत्राच्या वाढीला ऊर्जा देणारी इकॉनॉमी- व्हीएमवेअर आदी विषयांवर विविध तज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने झाली.

## स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मरणासाठी 'माझी माती, माझा देश' अभियान : चेतनसिंह केदार यांचे प्रतिपादन




सुराज्य/सांगोला

प्रत्येक नागरिकांच्या मनात स्वदेश, स्वधर्म आणि स्वाभिमान जागवण्याचे काम 'माझी माती, माझा देश' या अभियानाच्या माध्यमातून होणार आहे. 'माझी माती, माझा देश' अभियानाद्वारे स्वातंत्र्यसैनिकांचे कार्य सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवले जाणार आहे, असे मत भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांनी व्यक्त केले.

केंद्रशासनाच्या आझादी का अमृत महोत्सवानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चाच्यावतीने करमाळा तालुक्यात 'माझी माती, माझा देश' हे अभियान राबविण्यात आले. त्यावेळी केदार बोलत होते.

यावेळी सुदर्शन पाटसकर, गणेश चिवटे, विठ्ठलराव भणगे, शंभुराजे जगताप, शशिकांत पवार, सुहास घोलप, अमर साळुंखे, जगदीश अग्रवाल, अजित कुलते, दीपक चव्हाण, गणेश साखरे, जय डोंगरे, नवनाथ भुजबळ, संजय घोरपडे, रामभाऊ ढाणे, चंद्रकांत राखुंडे, नितीन कांबळे, कपिल मंडलिक, जितेश कटारिया, आदी उपस्थित होते.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM RE-TENDER NOTICE**

| Sr. No. | Tender No | Tender Detail | Tender/Enquiry RFX Number | Amount in Rs. | EMD | Tender Fee | Tender Publ. Date |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | EE/EHV/O&M /DN/SHP/T-15/2023-24. (Iind CALL) | SRM Re-Tender for work of painting of Transformer's/ ICT's available at various EHV Substations under jurisdiction of EHV O & M Division, Solapur. | RFX No:- 7000028719 (IInd CALL) | Rs. 24,18,176/- Including Taxes. | 25000/- | Rs. 525/- including GST | From Dtd. 10.10.2023 @ 09:00 Hrs To Dtd.18.10.2023 up to @ 16:00 Hrs |

For more details please visit SRM website:- www.mahatranasco.in or https//;srmetender.mahatransco.in Contact Details:- Addl Executive Engineer- 7447441096. Dy. Executive Engineer - 7447441043

Executive Engineer
EHV O & M Division,
Solapur

## संक्षिप्त वृत्त...



### अक्कलकोट इंडियन मॉडेल स्कूलचे शालेय हॉकी स्पर्धेत यश

**अक्कलकोट** : जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि सोलापूर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापूर येथे आयोजित १७ वर्षांखालील जिल्हास्तरीय शालेय हॉकी स्पर्धेत इंडियन मॉडेल स्कूल, अक्कलकोटने प्रथम क्रमांक पटकावला. विजयी संघात कर्णधार फैजान बागमारु, गुरुराज पत्रिके, शुभम मेंथे, करीम हुपळे, सुमित नलवार, अनिस बिराजदार, आदित्य राठोड, प्रसाद देडमनी, आदित्य पाटील, प्रतिक स्थावरमठ, शिवपूत्र करणे, सोहांक डुंगळे, शिवामृत तोळणुरे, आयुष्य चव्हाण, मीत राठोड,महांतेश मठ, साजिद शेख यांचा समावेश होता. या संघाला क्रीडाशिक्षक सतीशकुमार परदेशी, दयानंद दणुरे, राज्य हॉकी मार्गदर्शन जरार कुरेशी, हॉकी प्रशिक्षक आवेज होटगी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थापक अध्यक्ष सिद्धाराम म्हेत्रे, उपाध्यक्ष अमोल जोशी, सायली जोशी, सचिवा शीतल म्हेत्रे, मुख्याध्यापिका गौरी दातार, प्राचार्य डॉ. गणपती वाघमोडे यांनी अभिनंदन केले.

### जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या ग्रामीण कार्याध्यक्षपदी अक्षय भांड

**नातेपुते** : सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या कार्याध्यक्षपदी नातेपुते येथील अक्षय भांड यांची निवड करण्यात आली. राष्ट्रवादी युवकचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांनी भांड यांची निवड जाहीर केली. उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे, युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांनी नियुक्ती पत्र देऊन भांड यांचा सन्मान केला. भांड यांनी या आगोदर माळशिरस तालुका युवक अध्यक्ष, प्रदेश सचिव,पक्ष निरीक्षक



> प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे, युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर जिल्ह्यातील सर्व नेते मंडळींना विश्वासात घेऊन मी संपूर्ण जिल्ह्यात पक्ष संघटना वाढवण्यासाठी काम करणार आहे. युवकांना सोबत घेऊन गाव तिथे शाखा, घर तिथे कार्यकर्ता ही मोहीम संपूर्ण जिल्ह्यात राबविणार आहे.
>
> \- **अक्षय भांड**
> **(कार्याध्यक्ष, जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेस ग्रामीण)**

म्हणून काम केले आहे. तसेच माळशिरस तालुक्यामध्ये व तालुक्यातील खेडोपाडी या ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून युवकांसाठी भरीव कामगिरी केली आहे. या सर्व गोष्टींचा अनुभव असल्यामुळे सोलापूर जिल्ह्याला बळकट आणण्यासाठी भांड यांचा फायदा होईल, असा विश्वास पक्षश्रेष्ठींनी व्यक्त केला आहे.



### राज्यस्तरीय रात्र व्हॉलिबॉल स्पर्धेत माढा स्ट्राईकर संघ ठरला विजेता

**माढा** : सोलापूर जिल्हा शिवसेनेचे संपर्कप्रमुख प्रा. शिवाजी सावंत यांच्या ६३ व्या वाढदिवसानिमित्त रिस्क ग्रुपच्या वतीने माढ्यात आयोजित खुल्या राज्यस्तरीय दिवस-रात्र व्हॉलिबॉल स्पर्धेत महाराष्ट्र स्ट्राईकर संघाने २१ हजार रूपयांच्या बक्षिसासह विजेतेपद पटकावले. एबीएसपी पुणे संघाने १५ हजार रुपयांच्या बक्षिसासह द्वितीय तर तृतीय क्रमांकाचे १० हजार रूपयांचे पारितोषिक वाढवणा यशवंत संघाने पटकावले. दोन दिवसीय ही बॉस चषक स्पर्धा के.के. कन्ट्रशन्सने प्रायोजित केली होती. यावेळी रोख रकमेची वैयक्तिक पारितोषिके अमित गोसावी, संकेत पाटील, राज पाटील यांनी पटकावले. पृथ्वीराज सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली रिस्क ग्रुपचे अध्यक्ष अरविंद खरात यांच्या नेतृत्त्वाखाली आयोजित या स्पर्धेत राज्यातून १५ संघानी सहभाग नोंदवला. यावेळी प्रा. शिवाजी सावंत यांच्यासह आनंदराव कानडे, दादासाहेब साठे, राजेंद्र चवरे, मुन्ना साठे, दिगंबर वाघमारे, शहाजी साठे, नागेश खेडकर, मधुसूदन गायकवाड, आदित्य भांगे, शंभुराजे चवरे आदी क्रीडा रसिकांनी या स्पर्धेचा आनंद लुटला. स्पर्धे साठी उत्तम लाईट, साऊंड सिस्टिमसह संपूर्ण आयोजनासाठी अध्यक्ष अरविंद खरात, स्वप्निल खरात, पृथ्वीराज खेडकर, आकाश कुर्डे, आनंद भिसे, सुहास चवरे, शंभू कदम, अजिंक्य काटे, ऋषिकेश कानडे आदींनी परिश्रम घेतले.

### मंद्रूपमध्ये आ. गोपीचंद पडळकर यांची उद्या सभा होणार

**दक्षिण सोलापूर** : धनगर समाजाला एसटीचे आरक्षण मिळावे, यासाठी सोमवार, दि.१६ ऑक्टोबर रोजी दुपारी १ वाजता सकल धनगर समाज आणि धनगर आरक्षण कृती संघर्ष समिती यांच्या संयुक्त विद्यमाने मंद्रूप येथील लोकसेवा हायस्कूलच्या मैदान येथे आ. गोपीचंद पडळकर यांच्या जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारक समिती सदस्य अमोल कारंडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. धनगर समाजाला कर्नाटक राज्यातील एसटी आरक्षणाप्रमाणे महाराष्ट्रातील अनूसुचित जमाती प्रवर्गाचे आरक्षण मिळावे, यासाठी मागील अनेक वर्षापासून हा लढा महाराष्ट्र राज्यात सुरू आहे. या सभेला जिल्ह्यातील लाखो समाज बांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन धनगर कृती संघर्ष समितीचे समन्वय कारंडे यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस सुनील खटके, धनराज जानकर, सुभाष पाटोळे, सचिन मडूळकर, अभिषेक भाईकट्टी आदी उपस्थित होते.

# आदिशक्ती देवीच्या स्वागतासाठी सोलापूरकर सज्ज

## आज घटस्थापना ; पूजासाहित्य खरेदीसाठी बाजारपेठेत नागरिकांची गर्दी

**सुराज्य/सोलापूर**

शारदीय नवरात्रोत्सवास रविवार, दि. १५ ऑक्टोबरपासून प्रारंभ होत असल्यामुळे भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. सर्व सोलापूरकर आदिशक्ती देवीचे स्वागत करण्यासाठी सज्ज झाले आहेत. या पार्श्वभूमीवर शनिवारी (१४ ऑक्टोबर) दिवसभर विविध बाजारपेठेत खरेदीसाठी नागरिकांनी प्रचंड गर्दी केली होती.

विद्युत रोषणाईने उजळलेले मंदिर, तोरण अन् रंगीबेरंगी पताक्यांची आकर्षक सजावट, मंदिरात असलेले धार्मिक अन् सांस्कृतिक कार्यक्रम, महिला-युवतींनी घटस्थापनेसाठी केलेली जय्यत तयारी, अशा उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात शनिवारपासून शारदीय नवरात्रोत्सवाला प्रारंभ झाला आहे.

शनिवारी सोलापूरच्या बाजारपेठेत घटस्थापनेसाठी आवश्यक पूजासाहित्य, भगवतीची मूर्ती घेण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी दिसून आली. घटस्थापनेसाठी बोळकी, श्रीफळ, बदाम, खारीक, हळदीचे खांड, कापूर, टोपली, विड्याची पाने, काळी माती आदी पूजासाहित्य १०० ते १५० रूपयांपर्यंत तर अखंड ज्योत प्रज्वलीत ठेवण्यासाठी आवश्यक दगडी दिवा १०० रुपयांपासून ३०० रुपयांपर्यंत विक्री केला जात होता. पुजेच्या साहित्याचीदेखील १० ते १५ टक्के दरवाढ झाल्याचे दिसून आले.

शहरातील देवी मंदिर परिसरात स्वच्छतेसह रंगरंगोटी करण्यात आली आहे. आकर्षक विद्युत रोषणाईने मंदिर परिसर उजळून निघाले आहेत. देवी मंदिरात नवरात्रोत्सवात घटस्थापनेसह महापूजा, यज्ञ, देवींचा जागर आदी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

सोलापूरचे आराध्य दैवत असलेल्या रुपाभवानी मंदिरात पहाटेपासून दर्शनासाठी भाविकांची गर्दी होत असल्याने मंदिर व्यवस्थापनातर्फे विशेष उपाययोजना करण्यात आली आहे. शहरातील विविध देवी मंदिरात दर्शनासाठी पहाटेपासूनच महिला भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. त्या पार्श्वभूमीवर चोरट्यांचा सुरू असलेला उपद्रव लक्षात घेता रस्त्यांसह मंदिर परिसरात पोलिसांची गस्त वाढवावी , अशी मागणी भाविकांतर्फे करण्यात आली आहे.



अनेक मंडळांनी भव्य मंडप उभारले असून, सोमवारी देवीमूर्तीची सवाद्य मिरवणूक काढण्यात येणार असून, त्यानंतर मूर्ती प्रतिष्ठापना करण्यासाठी कार्यकर्ते सज्ज झाले आहेत.

## केंद्र,राज्य सरकार विकास कामांसाठी कायम कटीबद्ध : आ. कल्याणशेट्टी

**सुराज्य/अक्कलकोट**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वातील केंद्र सरकार आणि राज्यातील महायुती सरकार जनसेवेसाठी आणि विकास कामांसाठी कटीबद्ध असल्याचे प्रतिपादन आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी केले.

ग्रामदैवत मल्लिकार्जुन देवस्थान, किणी येथे सभामंडप व नियोजित भक्तनिवास कामाच्या भूमीपूजन प्रसंगी आ. कल्याणशेट्टी बोलत होते.

मल्लिकार्जुन देवस्थानसाठी उपलब्ध एकूण ४५ लाख रुपयांच्या निधींच्या कामापैकी पहिल्या टप्प्यातील कामाचे भूमिपूजन झाले. त्यावेळी आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी यासाठी निधी कमी पडू देणार नाही, अशी हमी दिली.

अध्यक्षस्थानी सरपंच प्राजक्ता जाधव होत्या. यावेळी अमोल हिप्परगे, आप्पासाहेब पाटील, दत्तात्रय मुनाळे, शरद किणीकर, गुरुनाथ मठ, मल्लिकार्जुन साखरे, अण्णप्पा अळ्ळीमोरे, अविनाश पाटील, मल्लिकार्जुन होटगे, अशोक रामशेट्टी, बिराप्पा वडरे, विजय घिवारे उपस्थित होते.

यासाठी वैजनाथ अळ्ळीमोरे, सोमनाथ साखरे, दत्तात्रय बिराजदार, बसवराज लिंबाणे, सुरेश कलशेट्टी, राजू टाके, इरेशा रामशेट्टी, अविनाश अळ्ळीमोरे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भीमराव तुळजापुरे, सूत्रसंचालन रितेष खुने, आभार दत्तात्रय बिराजदार यांनी मानले.

## 'वैयक्तिक स्वार्थासाठी उपनिबंधक कार्यालय अनगरला'

**सुराज्य/विरवडे बु.**

मोहोळ तालुक्याच्या विकासापेक्षा अनगरचे राजन पाटील यांनी वैयक्तीक स्वार्थाच्या विचारातून उपनिबंधक कार्यालय, हे अनगरला नेल्याची टिका जकराया कारखान्याचे कार्यकारी संचालक सचिन जाधव यांनी केले. तालुक्याचा दक्षिण भाग हा कायमच उपेक्षित आहे. भागाच्या विकासासाठी उपनिबंधक कार्यालय कामती येथेच व्हावे, यासाठी सर्वपक्षीय आंदोलन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

**उपनिबंधक कार्यालय कामतीत होण्यासाठी सर्वपक्षीय आंदोलन**

मोहोळ तालुक्याच्या दक्षिण भागातील सर्वपक्षीय नेत्यांनी एकत्र येत उपनिबंधक कार्यालय हे कामती बुद्रुक येथे व्हावे, यासाठी कामती चौकात आंदोलन केले. प्रशासनाच्यावतीने कामती विभागाचे सर्कल सालीमठ, तलाठी अशोक राठोड यांनी निवेदन स्वीकारले. यावेळी सचिन जाधव, उमेश पाटील, विजयराज डोंगरे, संजय क्षीरसागर, काकासाहेब देशमुख, सुनील चव्हाण, दिलीप गायकवाड, फंटू गोफणे आदींनी विचार मांडले.

कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी कामती पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजकुमार डुणगे यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.यावेळी अशोक भोसले, सुशील क्षीरसागर, रामचंद्र पतंगे, सत्यवान देशमुख, महेश धुमाळ, तुकाराम माने, बाळासाहेब डुबे-पाटील, सिध्दाराम म्हमाणे, राहुल क्षीरसागर, बंडू पाटील, नीलेश पाटील, हरिभाऊ काकडे, सादिक तांबोळी, संजय वाघमोडे, दीपक पुजारी, मुजीब मुजावर, राजु वराडे, जयसिंग अवताडे, विकास वाघमारे, विनोद आंबरे, प्रकाश अवताडे, दिनकर पवार, काका वाघमारे, बिटु खटके, भारत माने, विष्णू कदम, विजय पवार, दत्तात्रय भोसले, अर्जुन लोखंडे, सिध्दू काळे उपस्थित होते.

## शंभरच्या स्टँपचा तुटवडा; शंभरऐवजी 'पाचशे'चा मारला जातोय माथी

### कोषागार कार्यालयास पुरवठा झाला नसल्याचा फटका

**सुराज्य/सोलापूर**

सोलापूर शहरात गेल्या आठ दिवसांपासून शंभर रुपयांच्या स्टँपचा तुटवडा निर्माण झाला आहे. किरकोळ कामांसाठी लोकांना पाचशे रुपयांच्या स्टँप घेण्याची वेळ ग्राहकांवर आली आहे. ओळखीच्या ग्राहकांना शंभरचा स्टँप दिला जातो, मात्र अनोळखी ग्राहकांच्या माथी पाचशे रुपयांचा स्टँप मारला जात आहे. यामुळे मोठा भुर्दंड सहन करावा लागत असल्याच्या ग्राहकांच्या तक्रारी आहेत.

शहरातील बाँड विक्रेत्याकडे गेल्या आठ दिवसापासून शंभरचे स्टँप उपलब्ध होत नसल्याने ही अडचण निर्माण झाली आहे. कोषागार कार्यालयाकडून स्टँपचा पुरवठा झाला नसल्याचे सांगण्यात येत आहे.

जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात विविध कामांसाठी येणाऱ्यांच्या स्टँपसाठी रांगा दिसून येत आहेत. बँका तर स्टँप असल्याशिवाय काम करत नाहीत. त्यामुळे बँक प्रकरणासाठी प्रतिज्ञापत्र, बँकांची कर्ज प्रकरणे, जागांचे व्यवहार, भाडेकरार यासाठी शंभर रूपयांच्या स्टँपवर सर्व व्यवहार केले जात आहेत. पुरवठा झाला नाही की, स्टँपची कृत्रीम टंचाई निर्माण केली जात आहे, असा संशय व्यक्त केला जात आहे. वैतागलेल्या अनेकांनी अनेक नोटरी धारकांनी पाचशे रुपयांच्या स्टँपवर आपली कामे करण्यास सुरुवात केली आहे. शंभरचा स्टँप उपलब्ध नसल्याने चारशे रुपयांचा भुर्दंड लोकांना सोसावा लागत आहे.

बँकांमध्ये ८०० चे स्टँप देणे गरजेचे असताना हजारचे स्टँप द्यावे लागत आहेत. त्यामुळे तत्काळ स्टँपची उपलब्धता करावी, अशी मागणी होत आहे. दसरा दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर घर जागा खरेदी मोठ्या प्रमाणात केली जाते. यावर परिणाम व्हावा, यासाठी स्टँपचा तुटवडा केला जात असल्याचे बोलेले जात आहे.

> कोषागर कार्यालयाने ऑनलाईन स्टँप मिळण्याची सोय उपलब्ध केली आहे. ही ऑनलाईन प्रणाली काम करत नसल्याचे समजते. या माध्यमातून स्टँप कसा घ्यायचा, याची माहिती काही ग्राहकांना नसल्याने जादा दराचा स्टँप घ्यावा लागत आहे.

## शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतनातील फरक दिवाळीपूर्वी द्यावा

### कॉलेज कर्मचारी युनियनची मागणी

**सोलापूर** : राज्यातील महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतनातील राहिलेला रोखींचा फरक दिवाळीपूर्वी रोखीने द्यावा आणि भविष्य निर्वाह निधीमधील हप्ते जमा करावेत, अशी मागणी कॉलेज कर्मचारी युनियनने केली आहे.

युनियनने सोलापूरचे विभागीय शिक्षण सहसंचालक डॉ.उमेश काकडे यांना भेटून निवेदन दिले. त्याची एक प्रत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाठविली आहे. सेवानिवृत्त कर्मचारी, प्राचार्य, ग्रंथपालांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे अर्जित रजेचे रोखीकरण सर्व कर्मचाऱ्यांना डिसेंबर २३ पर्यंत देणार आहेत, असे काकडे यांनी युनियनच्या पदाधिकाऱ्यांना आश्वासन दिले.

निवेदन देतेप्रसंगी दत्ता भोसले, राजेंद्र गिड्डे, राहुल कराडे, आनंद व्हटकर, अजितकुमार संगवे, हनुमंत कारमकर, नंदकुमार ढवळसंगराव, विवेकानंद कोटा, श्रीनिवास आडके, गणेश खवीटकर, नाना डोंगरे, संतोष अलकुंटे आदी उपस्थित होते.

## हत्तरसंग-कुडलमध्ये स्वच्छता अभियान

**सुराज्य/दक्षिण सोलापूर**

भारत सरकारच्या स्वच्छता ही सेवा या उपक्रमांतर्गत विदर्भ कोकण ग्रामीण बँकेच्यावतीने तीर्थक्षेत्र असलेल्या हत्तरसंग-कुडल येथील संगमेश्वर देवस्थान परिसर स्वच्छ करुन स्वच्छता अभियान राबविण्यात आली. यावेळी बँकेचे ५० अधिकारी, कर्मचारी सहभागी होऊन येथील घाट आणि मंदिर परिसर स्वच्छ केला.

बँकेच्या औराद शाखेच्यावतीने दहा महिला बचत गटांना २५ लाखांचे कर्ज वितरण करण्यात आले.

अध्यक्षस्थानी क्षेत्रीय व्यवस्थापक रमेश खाडे होते. यावेळी संगमेश्वर देवस्थान ट्रस्टचे संगप्पा केरके, सचिव देवेंद्रप्पा पाटील, पंडीत पुजारी, मल्लप्पा पाटील, चन्नप्पा बगले, आण्णाराव पाटील, मल्लिकार्जुन यमदे, कल्लपा भतगुणकी आदी उपस्थित होते.

स्वागत, प्रास्ताविक विदर्भ कोकण बँकेचेशाखाधिकारी योगीनाथ साखरे यांनी केले. यावेळी हणमंत बगले, बँकेचे उत्कृष्ठ ग्राहक धर्मराज गुमते, सुनिल बशेट्टी, बचत गटाच्या बँकसखी सारिका काळे, भाग्यश्री लोहार, शोभा देवकते आदींचा सत्कार करण्यात आला. यावेळी बँकेचे अधिकारी दीपक डोळस यांनी महिलांना अल्प रकमेतील सुरक्षा विमा योजनांची माहिती दिली.

हत्तरसंग कुडल देवस्थानची ख्याती दूरवर पोहोचवणारे प्रसिद्ध शिलालेख वाचनकार कै. आनंद कुंभार यांच्या स्मृती जपण्याचा उद्देश बाळगून त्यांच्या कन्या कमल कुंभार (नळदुर्ग), काशीबाई कुंभार (विजयपूर), स्नुषा मालती कुंभार यांचा बँकेच्यावतीने सत्कार करण्यात आला.



कार्यक्रमात अंकिता सिंह, सारिका शेटलवाड, किरण बोबे, मालती गौरशेट्टी, धन्वंतरी तोटे यांनी आपली नृत्यकला सादर करुन स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. सूत्रसंचालन विश्वनाथ आमणे, आभार सत्यप्रकाश मेहता यांनी मानले. यावेळी वरिष्ठ व्यवस्थापक श्याम दमाह, अधिकारी असोसिएशनचे क्षेत्रीय सचिव मल्लिकार्जुन घोडके, पंचशीला कसबे, शंभुलिंग घेरडी उपस्थित होते. यासाठी अधिकारी संतोष भोसले, अरुण बस्ते, निखिल शर्मा, जयश्री सोनकांबळे, रोखपाल अविनाश काळे, अमीन आत्तार, मल्लिकार्जुन कांबळे, सिद्धू सलगरे आदींनी परिश्रम घेतले.

## गुरुशांतलिंगेश्वर यांची पुण्यतिथी; आज विविध कार्यक्रम

**सुराज्य/अक्कलकोट**

दुधनी येथील गुरुशांतलिंगेश्वर महास्वामीजी यांच्या ६५ व्या पुण्यतिथींचे औचित्य साधून राजशेखर महास्वामीजी यांचा पट्टाधिकार सुवर्ण आणि अमृत महोत्सवानिमित्त रविवार, दि. १५ ऑक्टोबर रोजी गुरुवंदना समर्पणासह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केल्याची माहिती विरक्त मठ दुधनींच्यावतीने देण्यात आली आहे.

डॉ. शांतलिंगेश्वर महास्वामीजींच्या मार्गदर्शनाखाली गुरूशांतलिंगेश्वर महास्वामीजी यांच्या पुण्यस्मरण उत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रम शटस्थल ध्वजारोहण रविवार, दि.१५ ऑक्टोबर रोजी सकाळी ८.३० वाजता शांतलिंगेश्वर महास्वामीजींच्या हस्ते होणार आहे. याचदिवशी रात्री ८ वाजता धर्मचिंतन कार्यक्रम होईल. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेडगी विरक्त मठाचे शिवबसवराजेंद्र महास्वामीजी व अक्कलकोट विरक्त मठाचे बसवलिंग महास्वामीजींच्या नेतृत्त्वाखाली व मैंदर्गी विरक्त मठाचे महांत महास्वामीजी, विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी, अफजलपूर, शंभुलिंग शिवाचार्य महास्वामीजी, हिरेमठ पडसलगी, शांतवीर शिवाचार्य महास्वामीजी ,हिरेमठ मादनहिप्परगा वीरपाक्ष देवरु शिवयोगी मंदिर यांच्या उपस्थितीत होणार आहे. रात्री ९ वा. श्री अमोगसिद्ध ढोळीन गायन संघ कोळुरगी आणि भीमाशंकर ढोळीन गायन संघ बसवनबागेवाडी यांचा जुगलबंदी कार्यक्रम होणार आहे.

`गुरुशांतलिंगेश्वर महास्वामीजी यांच्या पुण्यतिथींचे अवचित्य साधून राजशेखर महास्वामीजी विरक्त मठ नंदगाव, (ता. तुळजापूर) यांचा पट्टाधिकार सुवर्ण आणि अमृत महोत्सवानिमित्त सोमवार, दि. १६ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता गुरुवंदना समर्पण, अड्डपालखी, महाप्रसाद कार्यक्रम होणार आहे. दुपारी २.३० वाजता धर्मसभेचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम राजशेखर महास्वामीजी यांच्या अध्यक्षतेखाली तर महांत महास्वामीजी विरक्त मठ, नरोणा यांच्या नेतृत्त्वाखाली होणार आहे. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून शिवबसव राजेंद्र महास्वामीजी , श्री. ष. ब्र. डॉ चंन्नमल्लेश्वर शिवाचार्य महास्वामीजी ुर, . प्रभूशांत महास्वामीजी, श्री. म.नी.प्र. शिवलिंग महास्वामीजी यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम होणार आहे.

## बाळीवेस शक्तीपूजा मंडळाचा यंदा वामन अवतार देखावा

**सोलापूर** : बाळीवेस शक्तीपुजा व समाजसेवा मंडळाच्यावतीने रविवार, दि. १५ ऑक्टोबर रोजी सकाळी ९.३० वाजता शक्तीदेवीच्या मुर्तिची पूजा करून लेझीम ताफ्यांसह मिरवणूक काढण्यात येणार आहे. यंदा वामन अवतार हा देखावा सादर करण्यात येणार असल्याची माहिती अध्यक्ष सागर हिरेहब्बू यांनी पत्रकार परिषदेत दिली. सोमवार, दि. १६ ऑक्टोबर रोजी वामन अवतार या देखाव्याचे उद्‌घाटन सायंकाळी ७ वाजता करण्यात येणार आहे. यावेळी विश्वविनायक ढोल पथकाचे सादरीकरण करण्यात येणार आहे. दि. १७ व १८ ऑक्टोबर रोजी बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन केले आहे. गुरुवार, दि. १९ ऑक्टोबर रोजी सायं. ६ वाजता हळदी कुंकूम व महाआरती होईल. ह.भ.प. औसेकर महाराज व जलतरणपटू कीर्ती भराडियाच्या हस्ते हा कार्यक्रम होणार आहे. शुक्रवार, दि. २० ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता पोलीस कर्मचाऱ्यांच्या हस्ते शक्तीदेवीची पूजा होणार आहे. शनिवार, दि. २१ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ ते ५ वाजेपर्यंत रक्तदान व रक्ततपासणी शिबीर आयोजित केले आहे. यावेळी प्रथमेश तुळजापूरकर, आकाश कुंभार, प्रशांत धुम्मा, संकेत थोबडे, सचिन तुकमाळी आदी उपस्थित होते.

# ग्रामपंचायतीचा कारभार आता होणार डिजिटल

**पहिल्या टप्प्यात ५५० ग्रामपंचायती डिजिटल**

**क्युआर कोडचे सीईओ आव्हाळे यांच्या हस्ते वितरण**

**ग्रामपंचायतीचे आराखडे ऑनलाईन करा : सीईओ आव्हाळे**

सुराज्य/सोलापूर

**राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत आराखडे वेळेत ऑनलाईन करा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांनी केले. जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या.**



याप्रसंगी संचालक, पंचायत राजच्या राज्य व्यवस्थापन कक्ष संचालक आनंद भंडारी, उपसंचालक श्याम पटवारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशाधीन शेळकंदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, एचडीएफसी बँकेचे माधव मगे, अजिंक्य पुरवत, दयाशंख गायकवाड, क्षमता बांधणी तज्ज्ञ अमर ढाले, आदी उपस्थित होते.

सोलापूर जिल्ह्यातील ग्रामपंचायतीचा कारभार डिजिटल होणार असून, सर्व ग्रामपंचायतींचे एकाच बँकेत खाते काढण्यात आले असून, करसंकलनासाठी ग्रामपंचायतींना क्युआर कोड देण्यात आला आहे. सर्व ११ गटविकास अधिकाऱ्यांना क्युआर कोड्चे वितरण सीईओ आव्हाळे यांच्या हस्ते करण्यात आले. या बैठकीत सर्वांची योजना सर्वांचा विकास या मोहिमेचा आढावा घेण्यात आला.

**जिल्ह्यातील ग्रामपंचायतीचा कारभार डीजिटल होणार**

सोलापूर जिल्ह्यातील ग्रामपंचायतीचा कारभार डीजिटल होणार आहे. सर्व ग्रामपंचायतींचे एकाच बँकेत खाते काढण्यात आले असून, करसंकलनासाठी ग्रामपंचायतींना क्युआर कोड देण्यात आला आहे. ग्रामनिधी या नावाने खाते काढण्यात आले आहे. एचडीएफसी या बँकेने यासाठी पुढाकार घेतला आहे. जिल्ह्यातील ५५० ग्रामपंचायतींची खाती काढण्यात आली आहे. क्युआर कोडद्वारे सर्वांचे संकलन गटविकास अधिकारी व जिल्हा परिषद स्तरावर दररोज पाहता येणार आहे. लोकांना एका क्लिकवर कर ग्रामपंचायतीच्या खात्यावर भरणा करता येणार आहे, असेही उप मुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे यांनी सांगितले.

**लोकांना वेळेत दाखले द्या : मनिषा आव्हाळे**

राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत प्रशिक्षण वेळेत पूर्ण करा. आपले सरकार अंतर्गत सर्व ग्रामपंचायतींनी सर्व प्रकारची दाखले वेळेत द्यावेत. लोकांना चांगली सेवा द्या. आपले सरकार अंतर्गत इतर सुविधाही देण्यात याव्यात, अशा सक्त सूचना सीईओ आव्हाळे यांनी दिल्या. सीईओ मनिषा आव्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली हे काम सुरू असून, एचडीएफसी बँकेचे माधव मगे, अजिंक्य पुरवत, दयाशंख गायकवाड यांनी ग्रामपंचायतींची ऑनलाईन बँकिंग करून खाती काढण्यासाठी प्रयत्न केले आहेत.

## हेल्मेट, सीट बेल्टचा वापर केल्यास जीवित हानी टाळण्यास मदत

**पोलीस निरीक्षक विजय गायकवाड यांचे प्रतिपादन**

सुराज्य/सोलापूर

सुरक्षिततेसाठी आवश्यक हेल्मेट अथवा सीट बेल्ट न लावण्यामागील मानवी अनास्था आणि वाहतूक नियमांकडे उल्लंघन, दुर्लक्ष हेच अपघातास कारणीभूत ठरतात. प्रत्येकाने दुचाकी चालविताना आपल्या सुरक्षिततेसाठी डोईवर हेल्मेट लावणे असधि चारचाकी वाहनातून प्रवास करताना सीट बेल्ट लावणे गरजेचे आहे. ही चांगली सवय लावून घेतल्यास अपघातात होणारी संभाव्य जीवित हानी टाळण्यास मोलाची मदत होईल, असे प्रतिपादन महामार्ग पोलीस मदत केंद्र पाकणीचे




सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय गायकवाड यांनी केले.


ते सोलापूर-तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावरील हगलूर येथे ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामपंचायतीचे पदाधिकारी आणि ग्रामस्थांशी संवाद साधताना बोलत होते. यावेळी पोलीस उपनिरीक्षक हेमंत काटे, पोलीस हवालदार अविनाश चव्हाण उपस्थित होते.

नवरात्र महोत्सव, दसरा आणि कोजागिरी पौर्णिमेनिमित्त आई तुळजाभवानीच्या दर्शनासाठी तुळजापूरकडे पायी जाणाऱ्या भक्त-भाविकांच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने शासन प्रशासनाने सर्वतोपरी प्रयत्न केलेले असतातच. अशातूनही लहान-मोठी दुर्घटना घडल्यास, त्यांना तातडीने मदत मिळणे अपेक्षित असते. या मार्गावरील ग्रामस्थांनी गरजूंसाठी मृत्युंजय दूत म्हणून मदतीसाठी पुढे आले पाहिजे, असे आवाहनही गायकवाड यांनी केले. दुचाकी चालविताना मोबाईलवर बोलणे, हेल्मेटचा वापर टाळणे, मद्याच्या अंमलाखाली वाहन चालविणे व सीट बेल्ट न लावणे या वाईट सवयी म्हणून पाहिल्या पाहिजेत. त्यात सकारात्मक बदल करतानाचा प्रारंभ स्वतःपासून झाला तर अपघातांवर नियंत्रण येणे शक्य आहे, असा विश्वास गायकवाड यांनी व्यक्त केला.

## पंढरीत एकनाथी भागवत गजारुढ ग्रंथ दिंडी सोहळा

सुराज्य/पंढरपूर

श्रीक्षेत्र पंढरपूर येथे अश्विन शुद्ध १ शके १९४५ घटस्थापना नवरात्रारंभ या शुभदिनी रविवार, दि. १५ ऑक्टोबर २३ रोजी सकाळी ९ वाजता ग्रंथकौस्तुभ श्रीएकनाथी भागवत गजारुढ ग्रंथदिंडी सोहळा होणार आहे. वारकरी संप्रदाय परंपरेतील थोर संत शांतीब्रह्म श्रीएकनाथ महाराज यांच्या जलसमाधीस ४२५ वर्षे तर एकनाथी भागवत ग्रंथास ४५० वर्षे पूर्ण होत आहेत. या अमृत योगाप्रित्यर्थ ४५० वर्षांपूर्वी नाथमहाराज व 'भागवत ग्रंथाचा सन्मान' पवित्र काशीक्षेत्री विद्वानांच्या उपस्थितीत झाला. गजारुढ दिंडी सोहळ्याने अर्थात



हत्तीवर ग्रंथ मिरवणूक करुन गौरव झाला होता. त्याच पद्धतीने व त्याच्या स्मृती जागवण्यासाठी या सोहळ्याचे आयोजन केले आहे.

या दिंडी सोहळ्याची सुरुवात श्रीसंत नामदेव महाराज पायरीपासून होऊन संपूर्ण प्रदक्षिणा मार्गे निघेल, अशी माहिती संयोजक व निमंत्रक हभप देवव्रत (राणा) महाराज वासकर, वारकरी संप्रदाय पाईक संघ व हभप डॉ. भागवत कानडे समर्थ प्रतिष्ठानतर्फे देण्यात आली आहे.

## सिद्धेश्वर सेवक मंडळातर्फे व्याख्यानमालेचे आयोजन

सुराज्य/सोलापूर

श्री सिद्धेश्वर सेवक सांस्कृतिक मंडळ आणि सोलापूर सिद्धेश्वर सहकारी बँक यांच्यावतीने दि. १६ ते २० ऑक्टोबर दरम्यान शारदोत्सव सांस्कृतिक कार्यक्रम व व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती अध्यक्ष राम शर्मा यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सोलापूर येथील हुतात्मा स्मृती मंदिर येथे पाच दिवस रोज संध्याकाळी ६ वाजता ही व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. यंदाचे हे ४१ वे वर्ष आहे. सोमवार दि. १६ ऑक्टोबर रोजी शिवरंजनी म्युझिक ग्रुप प्रस्तुत 'गाणी तुमची - आमची' हा मराठी व हिंदी गीतांचा कार्यक्रम होणार आहे. परंपरेनुसार शारदोत्सव कार्यक्रमाची सुरुवात गीत संगीताच्या कार्यक्रमाने होणार आहे. मंगळवार दि. १७ ऑक्टोबर रोजी वक्ते अभिजीत जोग यांचे भारताचा इतिहास किती खरा किती खोटा या विषयावर व्याख्यान होणार आहे. बुधवार दि. १८ सप्टेंबर रोजी अशोक नायगावकर यांचे मिश्किली आणि कविता या विषयावर व्याख्यान होईल.

कवितांमधील मिश्किली सांगत दिलखुलास शैलीत श्रोत्यांना हास्य रंगात बुडवून टाकणार आहेत. गुरुवार दि. १९ ऑक्टोबर रोजी डॉ. उदय निरगुडकर यांचे भारत २०४७ या विषयावर व्याख्यान होणार आहे. सन १९४७ ते २०४७ या भारताच्या शतकाचा वेध घेणारे हे व्याख्यान राहणार आहे. शुक्रवार दि. २० ऑक्टोबर रोजी शिरीष देशपांडे यांचे 'लोच्या झाला रे' सायबर गुन्हे आणि आपण या विषयावर व्याख्यान होणार आहे

या पत्रकार परिषदेत काशिनाथ चव्हाण, शिवशंकर हळगुणकी, मिलिंद लिगाडे, चंद्रकांत म्हेत्रे, अनिल वजीरकर आदी उपस्थित होते.

## शासकीय दाखल्यांसाठी कोणासही वेठीस धरू नका

**आमदार समाधान आवताडे यांची सूचना**

सुराज्य/लक्ष्मी दहीवडी

मंगळवेढा तालुक्यातील तहसील आणि अन्य शासकीय कार्यालयात शासकीय, वैद्यकीय व अन्य योजनांचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थी, नागरीक येत असतात. छोट्या-मोठ्या व किरकोळ कारणांसाठी त्यांनरा वेठीस धरू नका, अशा सूचना आमदार समाधान आवताडे यांनी तालुक्यातील विविध प्रशासकीय यंत्रणा, सेतू,महा-ई-सेवा केंद्र चालकांना दिल्या आहेत.

मंगळवेढा तालुक्यातील सेतूचालक, महा-ई-सेवा केंद्र चालकांची आ. आवताडे यांनी मंगळवेढा जनसंपर्क कार्यालयामध्ये बैठक घेतली. त्यावेळी त्यांनी विविध सूचना



केल्या. याप्रसंगी आ. आवताडे म्हणाले, 'मंगळवेढा तालुक्यामध्ये सध्या जवळपास ५५ महा-ई-सेवा केंद्रे कार्यरत आहेत. याअंतर्गत विद्यार्थ्यांना विविध स्कॉलरशिप, उच्चशिक्षणासाठी प्रवेश, निरनिराळ्या स्पर्धा परीक्षांसाठी लागणारे शासकीय दाखले, उत्पन्न दाखले आदी कागदपत्रांची आवश्यकता असते. विद्यार्थ्यांसह शेतकरी, ग्रामस्थ, नागरिकांना गरजेचे असणारे दाखले देण्यासाठी कोणत्याही प्रकारची चालढकल न करता, अथवा शासकीय फी पेक्षा जास्त शुल्क आकारून त्यांची आर्थिक पिळवणूक करण्याचा कोणीही प्रयत्न करू नये.

तांत्रिक त्रुटी लवकरात-लवकर बाजूला करुन आवश्यक दाखले त्वरीत उपलब्ध करून देण्यात यावी. महा-ई-सेवा केंद्र चालकांच्या विविध समस्या अथवा अडी-अडचणी सोडविण्यासाठी आपण सदैव शासनदरबारी आपल्यासोबत आहोत. यावेळी नायब तहसीलदार चंद्रकांत हेडगेरे, संजय पवार, विवेक ढेरे, दिगंबर यादव उपस्थित होते.

## संसद सदस्य समिती अध्यक्षपदी खा.डॉ. महास्वामी

**मध्य रेल्वे विभागाच्या बैठकीत विविध समस्या सोडविण्याची मागणी**

सुराज्य/सोलापूर

मध्य रेल्वे सोलापूर विभागातील रेल्वेंना थांबा देणे, मुंबई - सोलापूर वंदे भारत रेल्वेच्या वेळेत बदल करणे, अमृत भारत योजनेअंतर्गत अक्कलकोट रोड व मोहोळ रेल्वे स्थानकाचा समावेश करणे, सोलापूर - तुळजापूर - धाराशिव या नवीन रेल्वे मार्गाच्या भूसंपादन काम लवकर पूर्ण करणे, सांगोला - मंगळवेढा - सोलापूर नवीन रेल्वे मार्गाचे सर्वेक्षण करणे, दौंड ते कलबूर्गी लोकल शटल सेवा अथवा डेमू रेल्वे सुरू करणे, रेल्वेचा सोलापूर पर्यंत विस्तार करणे, पंढरपूर वाराणसी नवीन रेल्वेची सुरू करणे, यांसह विविध मागण्या खा. डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांनी मांडल्या.

पुणे येथे आयोजित केलेल्या सोलापूर, पुणे विभागातील संसद सदस्य समितीच्या अध्यक्षपदी खा.डॉ.जयसिद्धेश्वर महास्वामीजी यांची एकमताने निवड केली. या समितीच्या बैठकीत खा. डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांनी सोलापूर विभागातील रेल्वेच्या समस्या सोडविण्याबाबत सूचना केल्या. यावेळी मध्य रेल्वेचे महाप्रबंधक नरेश ललवाणी, सोलापूर आणि पुणे विभागातील लोकसभा व राज्यसभा सदस्य, डी. आर.एम, अधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना, वंदे भारत रेल्वे मुंबईहून सोलापूरकडे धावणार्या गाडीच्या वेळेत बदल करण्याची मागणी केली. ४ वाजता सुटणारी वंदे भारत मुंबई हून ६ वाजता सोडावी जेणेकरून मुंबईतील कामकाज संपवून पुणे, सोलापूरकडे येणे अधिक सुविधेचा होईल अशी मागणी केली .



अमृत भारत योजनेत सोलापूर, दुधनी, कुर्डुवाडी रेल्वे स्थानकांचा समावेश यापूर्वी करण्यात आला आहे. परंतु अक्कलकोट रोड व मोहोळ रेल्वे स्थानकांचा समावेश करण्यात यावा. या योजनेअंतर्गत दोन्ही रेल्वे स्टेशनचा समावेश करण्याची मागणी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव आणि राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्याकडे करण्यात आली होती. त्यामुळे दोन्ही ठिकाणांच्या समावेशासाठी विभागातून लवकरात लवकर प्रस्ताव पाठवण्याची मागणी केली आहे. दौंड-कलबुर्गी-दौंड लोकल (शटल सेवा) सुरू करण्याची आवश्यकता आहे. तसेच दौंड- कलबुर्गी- दौंड डेमो रेल नसल्याने दौंड, पंढरपूर सोलापूर, कलबुर्गीला जाणारे प्रवासी, भाविकांची गैरसोय होत आहे. त्यामुळेच ही डेमो रेल्वे दौंड - कलबुर्गी - दौंड या दरम्यानचा प्रवास करताना प्रवाशांची शेतकरी, विद्यार्थी आदींची मोठी गैरसोय होत आहे. त्यामुळे ही रेल्वे सुरू करण्यासाठी लवकरात लवकर प्रस्ताव पाठवावा अशा सूचना केल्या आहेत.


सोलापूर - नागपूर एक्सप्रेस ही गाडी पुन्हा सुरू करावी. हुबळी एक्सप्रेसचा विस्तार सोलापूरपर्यंत करावा यामुळे सोलापुर पर्यंत येणाऱ्या प्रवाशांना दिलासा मिळेल. नवीन पंढरपूर-वाराणसी- पंढरपूर एक्सप्रेस गाडी आठवड्यातून दोन दिवस सुरू करण्याची मागणी केली. दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असलेले श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिर, पंढरपूर आणि श्री. काशी विश्वनाथ या दोन्ही तीर्थक्षेत्रांना वाराणसीशी जोडणारी ही रेल्वे सुरू व्हावी. दुधनी रेल्वे स्थानकावर ५%६५९ फलकनुमा पॅसेंजर, ५७६२८ कलबूर्गी - सोलापूर पॅसेंजर, २२१५५ कलबूर्गी - कोल्हापूर एक्सप्रेस, १७३२० हुबळी एकरप्रेस या चार रेल्वे गाड्यांना थांबा मिळावा. दुधनी रेल्वे स्थानक जवळ रेल्वे पूल आहे परंतु पुलाच्या दुसऱ्या बाजूला शाळा, रुग्णालय आदींमुळे प्रवासी व स्थानिक नागरिकांची गैरसोय होत आहे. त्यामुळे पुलांच्या विस्तारी करणाची मागणी केली. यावेळी मध्य रेल्वेचे महाप्रबंधक नरेश ललवाणी यांनी सर्व प्रश्न सोडविण्यासाठी सकारात्मकता दर्शविली.

## थोडक्यात महत्त्वाचे




### वालचंदमध्ये ४२१ जणांचे रक्तदान

**सोलापूर** : वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये ४२१ जणांनी रक्तदान केले. श्रीमान भाऊसाहेब गांधी यांच्या स्मरणार्थ वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजीच्या राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत आणि श्री भाऊसाहेब गांधी प्रतिष्ठान यांच्या विद्यमाने हे रक्तदान शिबीर आयोजित केले होते. यावेळी मानद सचिव डॉ. रणजित गांधी, विश्वस्त भूषण शहा, पराग शहा, प्राचार्य डॉ. विजय आठवले उपस्थित होते. यासाठी, प्रा. महेश महंत, प्रवीण काथवटे, सुप्रिया कोंडा, गणेश आगलावे, सुनील जुनवणे, दीपाली वाडकर, वैभव अवधूत यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक, सूत्रसंचालन वंशिता मुनोत तर उपस्थितांचे आभार स्नेहल नारायणकर यांनी केले.




### संजय गांधी, श्रावण बाळ योजना शिबिरात १६२ अर्ज दाखल

**वेळापूर** : वेळापूर, ग्रामपंचायत कार्यालय (माळशिरस) येथे आयोजित शासकीय उत्पन्न दाखला, संजय गांधी, श्रावण बाळ निराधार योजनेच्या शिबिरात १६२ जणांनी अर्ज दाखल केले. जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य व अकलूज मार्केट कमिटीचे संचालक उत्तम जानकर यांच्या मार्गदर्शनाखाली अमोल पनासे मित्र परिवाराच्यावतीने हे शिबीर आयोजित केले होते. यावेळी संजय गांधी, श्रावण बाळ निराधार आदी योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन उत्तम जानकर यांनी केले. यासाठी रजनीश बनसोडे, उपसरपंच नानासो मुंगुसकर, ग्रामविकास अधिकारी कैलास सुरवसे, जावेद मुलाणी, अमोल पनासे यांनी परिश्रम घेतले.




### 'साक्षरतेबरोबरच सर्वांगीण विकास साधणे महत्त्वाचे'

**मोहोळ** : असाक्षरांना साक्षर करण्याबरोबरच त्यांचा सर्वांगीण विकास साधणे हे सेवा विकास ट्रस्टचे महत्त्वाचे उद्दिष्ट असून, त्यासाठी हा छोटासा प्रयत्न असल्याचे प्रतिपादन महेश कायगुडे यांनी केले. मोहोळ येथे बीलिव्हर्स इस्टर्न चर्चच्यावतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी तालुक्यात पाच ठिकाणी वर्ग चालू करण्यात आले असून, त्या शाळेत शिकविणाऱ्या शिक्षकांना ब्लॅक बोर्ड, नाईट लँप, स्टेन्सील-पाट्या आदींसह शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. वृक्ष लागवडीसाठी रोपेही देण्यात आली. यावेळी बीलिव्हर्स इस्टर्न चर्चचे पास्टर मोजेस आखाडे, सुजाता आखाडे, मार्गरिट ससाणे, सुरेखा आखाडे, रोजमेरे नाईकनवरे, पास्टर किरण कदम आदी उपस्थित होते. आभार प्रदर्शन पास्टर मोजेस आखाडे यांनी केले.

### व्यंकटेश्वरनगर नवरात्र संघटनेतर्फे साडेतीन शक्तीपीठाचा देखावा

**सोलापूर** : पूर्व भागातील मानाचा दाजी पेठ बालाजी मंदिर जवळ असणाऱ्या श्री व्यंकटेश्वर नगर नवरात्र महोत्सव युवक संघटनेच्या वतीने यंदा साडेतीन शक्तीपीठाचा देखावा सादर करण्यात येणार असल्याची माहिती अध्यक्ष श्रीधर चिंता यांनी पत्रकार परिषदेत दिली. या संघटनेची ५० वर्षापासूनची जुनी परंपरा आहे. विविध उपक्रम राबविले जातात. यंदाच्या नवरात्र महोत्सवामध्ये महाराष्ट्रातील कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी, माता कोल्हापूर करवीर निवासिनी श्री महालक्ष्मी, माता माहूरगडची श्री रेणुका माता, वनीची श्री सप्तशृंगी माता असे साडेतीन शक्तीपीठाचा भव्य देखावा सादर करण्यात येणार आहे. त्यासाठी वेगवेगळे चार मंडप उभारण्यात आले आहेत. नयनरम्य अशी विद्युत रोषणाई करण्यात येणार आहे. दि. १७ ते २३ ऑक्टोबर दरम्यान संध्याकाळी पाच ते रात्री दहा दरम्यान देखावा पाहण्यासाठी भक्तगणांनी जरूर भेट द्यावी, असे आवाहनही अध्यक्ष श्रीधर चिंता यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस गणेश ईप्पलपल्ली, दीपक अगलदिवटे, संतोष येमुल आदी उपस्थित होते.

### सदलापूर येथे काठीने मारहाण; पिता-पुत्र जखमी

**सोलापूर** : घरासमोर गोंधळ करू नका असे सांगितल्याच्या कारणावरून काठी आणि लाथाबुक्याने केलेल्या मारहाणी पिता-पुत्र जखमी झाले ही घटना सदलापूर तालुका अक्कलकोट येथे शुक्रवारी दुपारच्या सुमारास घडली या प्रकरणात अक्कलकोट उत्तर च्या पोलिसांनी देवेंद्र राजू बनसोडे यांच्यासह तिघाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे . महादेव बाबू पात्रे (वय ३२ ) आणि त्यांचे वडील बाबू पात्रे (वय ६२ दोघे रा. सदलापूर) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले. पात्रे यांच्या घराजवळ ऊस तोडीचे कामगार गोंधळ करत होते. त्यावेळी पात्रे यांनी घराजवळ गोंधळ करू नका असे सांगितले. तेंव्हा त्यापैकी एकाने पळत जाऊन देवेंद्र बनसोडे याला बोलावून आणले. त्याने आमच्या माणसाला का शिवीगाळ केली ? असे म्हणत महादेवाला मारहाण केली. ते दवाखान्यात गेल्यानंतर पुन्हा सायंकाळच्या सुमारास आरोपींनी त्यांच्या वडिलांना मारहाण केली .अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार सुरवसे पुढील तपास करीत आहेत.

### सुभाष पाटील यांची अधीक्षकपदी पदोन्नती

**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील झिंजेवस्ती येथील सुभाष रामचंद्र पाटील यांची नुकतीच कृषी आयुक्तालय, पुणे येथे अधीक्षकपदी पदोन्नती झाली आहे. यापूर्वी ते माढा येथील तालुका कृषी कार्यालयात सहाय्यक अधीक्षक म्हणून कार्यरत होते.

# शेतफवारणी होणार ड्रोनव्दारे

सुराज्य/मुंबई

शेतीवर औषधांसह बी-बियाण्यांची फवारणी आता ड्रोनद्वारे होणार आहे. शेतकरी एकरी ५०० रुपये खर्च करून हे काम करू शकतील. राज्य सरकारने मारूत 'ड्रोन' या कंपनीशी यासाठी करार केला आहे. त्याचा पायलट प्रकल्प बुलडाणा जिल्ह्यात राबविण्यात आला आहे.

शेतीला तंत्रज्ञानाची जोड देऊन उत्पादकता वाढविण्याचे केंद्र सरकारचे उद्दिष्ट आहे. त्यासाठीच प्रत्येक राज्यातील कृषी विभागाने आगळे प्रयोग राबवावे, अशी सूचना केंद्राकडून देण्यात आली आहे.



याअंतर्गतच ड्रोनद्वारे फवारणीचा प्रयोग हाती घेण्यात आला आहे. येत्या काळात राज्यभर याचा विस्तार होणार आहे. संबंधितांनी दिलेल्या माहितीनुसार, या कामासाठी मारूत एजी-३६५एस' हे ड्रोन वापरले जात आहे. त्याद्वारे औषधे व बियाण्यांची फवारणी करता येते. हे ड्रोन एका चार्जिंगमध्ये २२ मिनिटांपर्यंत उड्डाण करू शकते.

आतापर्यंत दीड लाख एकरावर यशस्वी फवारणी झाली आहे. तसेच पीकआधारित फवारणीसाठी ड्रोनमध्ये हवे तसे बदलदेखील करता येतात. यासाठी राज्याच्या कृषी विभागाच्या सहकार्याने कृषी यांत्रिकीकरणासाठीचा उपक्रम (एसएमएएम) हाती घेण्यात आला आहे. हा उपक्रम सर्व राज्यांमध्ये राबविला जात आहे.

त्याद्वारे उत्पादकता प्रतिहेक्टर किमान अडीच किलोने वाढविता येणार आहे.या ड्रोन सेवेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना प्रति एकर ५०० रुपयांचा खर्च आहे. मात्र शेतकरी हे ड्रोन खरेदीही करू शकतात. त्यासाठी १० लाख रुपयांचे कर्ज घेऊ शकतात. ते त्यांना वार्षिक पाच ते सहा टक्के व्याजदराने मिळू शकेल.

ड्रोन चालविण्यासाठी नागरी हवाई वाहतूक महासंचालकांच्या (डीजीसीए) परवान्याची गरज असते. हा शेतकरी मारुत ड्रोन ॲकॅडमीत या परवान्यासह प्रशिक्षण घेऊ शकणार आहेत. इयत्ता दहावी उत्तीर्ण व भारतीय पारपत्र असलेले या प्रशिक्षणासाठी पात्र आहेत. या प्रशिक्षणानंतर शेतकरी स्वत: ड्रोनचा वापर त्यांच्या शेतात करू शकतील.

# लोकसभेचे काउंटडाऊन सुरु; निवडणूक अधिकारी पूर्वतयारीला

सुराज्य/मुंबई

**आगामी लोकसभा निवडणुकांची पूर्व तयारी राज्यातील सर्व जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांमार्फत सुरू आहे. तसेच राज्यातील सर्व विधानसभा मतदारसंघातील मतदारयाद्यांचे विशेष संक्षिप्त पुनरीक्षण एक जानेवारी २०२४ या अर्हता दिनांकावर करण्याचा कार्यक्रम सुरू आहे. आगामी लोकसभा निवडणुका-२०२४ मध्ये होणार असून त्या दृष्टीने राज्यातील मतदारयाद्या अद्ययावत करण्यासाठी हा कार्यक्रम महत्त्वाचा आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाचे उपायुक्त हिर्देशकुमार यांच्या नेतृत्वाखालील आयोगाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पथकाने राज्याचा दौरा केला.**



या पथकामध्ये भारत निवडणूक आयोगाचे वरिष्ठ प्रधान सचिव एन. एन. बुटोलिया, सचिव सौम्यजित घोष, सचिव सुमनकुमार दास यांचा समावेश होता. या पथकाने सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या समवेत सह्याद्री अतिथीगृहात नुकतीच बैठक घेऊन मार्गदर्शन केले. या बैठकीत सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी जिल्ह्यांचे सादरीकरण आयोगासमोर केले. राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे, सहमुख्य निवडणूक अधिकारी म. रा. पारकर तसेच मुख्य निवडणूक कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राज्यात सर्व जिल्ह्यांमध्ये १८-१९ वर्षे वयोगटातील मतदारनोंदणींची टक्केवारी वाढविण्यासाठी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत, शाळा, महाविद्यालये, विविध आस्थापनांमध्ये विशेष मोहीम राबविणे, मतदार साक्षरता मंडळ, स्वयंसेवीसंस्था, महाविद्यालयातील स्वयंसेवकांच्या मदतीने या वयोगटातील अधिकाधिक तरुणांचे नाव मतदारयादीत समाविष्ट करणे, मतदारनोंदणी अधिकाऱ्यांकडून महाविद्यालय निहाय मतदारनोंदणीचा आढावा नियमित घेणे आदी उपाययोजना सुचविल्या आहेत.

राज्यातील महिला तसेच दिव्यांग व्यक्तींच्या मतदारनोंदणीची टक्केवारी वाढविण्यासाठी विशेष मोहीम राबवत ग्रामसभांमध्ये मतदारयाद्यांचे वाचन करून टक्केवारी वाढविण्याचे निर्देश दिले. मतदारयादींमधील दुबार तसेच मृत व्यक्तींची नावे वगळण्याबाबत करावयाच्या कार्यवाहीचे मार्गदर्शन आयोगाने केले. मतदान केंद्रांमध्ये सर्व किमान आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देश यावेळी देण्यात आले.

लोकसभा निवडणुका-२०१९ मधील मतदानाची राष्ट्रीय सरासरी तसेच राज्य सरासरीपेक्षा कमी सरासरी असलेल्या विधानसभा मतदारसंघाकडे विशेष लक्ष देऊन तेथील मतदानाची आकडेवारी वाढविण्याच्या दृष्टीनेही आयोगाने उपाययोजना सुचविल्या आहेत. मतदारयाद्या, अद्ययावत करण्याच्या कामात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकाऱ्यांना राष्ट्रीय मतदानाच्या दिवशी सन्मानित करण्यात येईल, असेही मुख्य निवडणूक अधिकारी देशपांडे यांनी सांगितले.

## एनसीबी महासंचालकांची माहिती

# सन २०१५नंतर समुद्री तस्करीत मोठी वाढ

सुराज्य/मुंबई

सीमेपलीकडून होणाऱ्या अंमली पदार्थ तस्करीविरुद्ध राजस्थान, पंजाबमध्ये कडक पावले उचलण्यात आली आहेत. प्रसंगी ड्रोनद्वारेही देखरेख ठेवली जात आहे. रस्तेमार्गे होणाऱ्या अंमली पदार्थ तस्करीच्या सीमा बंद झाल्याने सन २०१५नंतर समुद्री अंमली पदार्थ तस्करीत मोठी वाढ झाली आहे, अशी महत्त्वाची माहिती नार्कोटिक्स कन्ट्रोल ब्युरोचे (एनसीबी) उपमहासंचालक (नैऋत्य व दक्षिण प्रदेश) एस. के. सिंह यांनी शुक्रवार मुंबईत पत्रकारांना दिली.

नैऋत्य प्रदेश महासंचालनालयाचा भाग असलेल्या एनसीबीच्या मुंबई क्षेत्रीय संचालक कार्यालयाने अलीकडेच तीन मोठ्या कारवायांत ८० कोटी रुपयांच्या अंमली पदार्थांची जप्ती केली. तसेच अंमली पदार्थ तयार करणाऱ्या दोन मोठ्या प्रयोगशाळा उद्ध्वस्त केल्या. त्यासंबंधी पत्रकार परिषदेत माहिती देताना एस. के. सिंह यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरात समुद्री नार्को तस्करीवर प्रकाश टाकला. नौदलाने अलीकडेच एनसीबीकडून मिळालेल्या गुप्त माहितीच्याआधारे समुद्रात



महत्त्वाच्या कारवाया केल्या, याबाबत विचारले असता सिंह म्हणाले, अंमली पदार्थ तपासासंबंधीच्या सर्व संस्था कायम समन्वय ठेवून असतो. समुद्रातील तस्करी वाढली आहे.

समुद्रात आम्ही कारवाई करू शकत नाही. त्यामुळेच नौदलाला याबाबत माहिती दिली जाते. त्यातूनच तीन मोठ्या कारवाया अलीकडच्या काळात करण्यात आल्या आहेत.'

# शेती विकून विठूराया चरणी २६ तोळ्यांचा सोन्याचा करदोडा

सुराज्य/पंढरपूर

पंढरपुरातील सावळ्या शेती विकून आलेल्या पैशातून एका महिलेने तब्बल २६ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने विठूरायाच्या चरणी दान केले. या भक्त महिलेच्या दानशूरपणाची चर्चा पंचक्रोशीत रंगली आहे.





धाराशीव जिल्ह्यातील महिलेने पंढरपुरात श्रीविठ्ठल मंदिरात २५.५ तोळे वजनाचा सोन्याचा करदोडा दान केला. तर रुक्मिणी मातेला जवळपास दोन तोळे वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र अर्पण केले. याची एकत्रित किंमत १८ लाख रुपयांच्या घरात जाते.

विठूरायापासून तुळजाभवानी, अंबाबाईपर्यंत आणि लालबागचा राजापासून सिद्धिविनायकापर्यंत लाडक्या देवाच्या चरणी दानधर्म करणाऱ्या भक्तांची संख्या महाराष्ट्रात कमी नाही. फक्त राज्यातूनच नव्हे, तर देश-परदेशातून मोठमोठ्या दानाचा ओघ महाराष्ट्रातील विविध तीर्थक्षेत्रांना होताना दिसतो. पंढरपुरातील सावळ्या विठ्ठलाच्या चरणीही एका आजीबाईंनी दान दिलं आहे.

विशेष म्हणजे शेती विकून त्यांनी जणू आपलं सर्वस्वच देवाचरणी अर्पण केलं आहे. मला माझ्या विठुरायाशिवाय आहे तरी कोण? असे म्हणत आजीबाईंनी दान केले. बाई लिंबा वाघे असे या महिला भक्ताचे नाव आहे. शेती विकल्यानंतर आलेल्या पैशांतून त्यांनी देवाला २६ तोळे सोन्याचा करदोडा अर्पण केला.

## संक्षिप्त वृत्त...

### आंध्रातून फरार चोरटे सांगलीत सापडले

**सांगली :** आंध्र प्रदेशात गलाई व्यावसायिकांच्या घरावर दरोडा टाकून १ कोटी ७७ लाख रूपयांच्या सोन्यासह पलायन केलेल्या तिघांच्या टोळीला सांगलीजवळ बुधगाव येथे सांगली पोलिसांनी आंध्रप्रदेश पोलिसांच्या मदतीने शुक्रवारी अटक केली. नामदेव देवकर यांचा वंगुरवाडी रोड, टुनुक आंध्र प्रदेश येथे गलाई व्यवसाय असून ते त्याच ठिकाणी पत्नीसह वास्तव्यास आहेत. गुरूवारी सायंकाळी साडेसात वाजणेच्या सुमारास दुकानातील कामगार सूरज कुंभार आणि त्याच्या साथीदारांनी घरात घुसून हत्याराचा धाक दाखवून हातपाय बांधून व तोंडाला चिकटपट्टी लावून तिजोरीत ठेवलेले सोन्याचे दागिने, बिस्किटे व एक लाखाची रोखड असा १ कोटी ७७ लाख ८१ हजाराचा ऐवज लंपास केला. तिघांनीही दरोडा टाकून फिर्यादी देवकर यांची अल्टो मोटार घेउन पलायन केले होते.

### पैशांसाठी बनावट प्रोफाइल्सचा सुळसुळाट

**नाशिक :** फेसबुकवर अनेकांचे बनावट प्रोफाइल तयार करून त्याद्वारे इतरांना फ्रेंड रिक्वेस्ट पाठवून सैन्यातील अथवा केंद्रीय राखीव पोलीस दलातील जवान असल्याचे भासवून आर्थिक फसवणूक करण्यात येत आहे. माझा मित्र सैन्यात आहे. त्याचे फर्निचर विक्री करायचे आहे', अशी बतावणी करून हजारो रुपयांचा गंडा घातल्याच्या तक्रारी सायबर पोलिसांत प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे पैशांसाठी 'हॅकर्स'कडून होणाऱ्या या बनावापासून सावधान राहण्याचे आवाहन सायबर पोलिसांनी केले आहे. एखाद्या प्रतिष्ठित व्यक्तीच्या नावे बनावट फेसबुक प्रोफाइल तयार करण्यात येते. त्यामध्ये वरिष्ठ शासकीय अधिकाऱ्यांसह सेवानिवृत्त अधिकारी व खासगी सेवेतील नामांकित व्यक्तींच्या नावे बनावट प्रोफाइल तयार झाले आहेत.

### फटाके स्टॉलसाठीच्या धोरणात मोठे बदल

**नाशिक :** छत्रपती संभाजीनगरमधील दुर्घटनेनंतर फटाक्याच्या स्टॉल्सबाबतचे नियम आता आणखी कठोर झाले आहेत. छोट्या-छोट्या स्टॉल्समुळे होणारी गर्दी आणि या स्टॉल्ससाठीची अवाजवी सरकारी किमतीमुळे लिलावाला थंड प्रतिसाद मिळतो.

परिणामी, महापालिकेचेही आर्थिक नुकसान होते. यासाठी महापालिकेने फटाके स्टॉल्सच्या धोरणात आता बदल केले आहेत. नव्या नियमांनुसार मोठ्या आकाराचे फटाके स्टॉल्स उभारले जाणार असून, लिलावाच्या सरकारी किमतीतही सुधारणा केली जाणार आहे.

### ताडोब्याची 'माया' दीड महिन्यांपासून गायब?

**चंद्रपूर :** ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात येणाऱ्या पर्यटकांना भूरळ पाडणारी माया वाघीण सुमारे दीड महिन्यांपासून बेपत्ता आहे. ट्रॅप कॅमेरे लावून तिचा शोध घेतला जात आहे. पण, ती नेमकी कुठे आहे याबाबत काहीही माहिती अजून मिळालेली नाही. तिने बछड्यांना जन्म दिला असावा, त्यांना सुरक्षित ठेवण्यासाठी बाहेर निघत नसावी, वय झाले असल्याने नैसर्गिक मृत्यू झाला असावा असे अंदाज वर्तविले जात आहेत. यापूर्वी २५ ऑगस्टला पंचधारा भागात वनमजुरांना ती दिसली होती. ती गर्भवती असल्याचे दिसून आले होते. तिची प्रसूती होऊन बछडे असल्याने ती बाहेर येत नसावी, अशी शक्यता ताडोबा प्रकल्पातील सूत्रांनी दिली.

### तरुणीला भररस्त्यात संपवून तरुण फरार


**पालघर :** कोयत्याने गळा चिरून विद्यार्थिनीची हत्या करणाऱ्या तरुणाने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना मोखाडा येथे घडली आहे. प्रभाकर वाघरे (वय २२ वर्षे) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे.

पालघर जिल्ह्यातील मोखाड्यातील गभालपाडा आश्रमशाळेत इयत्ता बारावीत शिकणारी अर्चना उदार ही विद्यार्थीनी महाविद्यालयात गेली होती. दुपारच्या वेळेस जेवणासाठी महाविद्यालयातून आश्रमशाळेच्या दिशेने परत जात असताना मागून पिशवीत कोयता घेऊन आलेल्या प्रभाकर वाघरेने तिच्यावर जीवघेणा हल्ला केला. त्याने कोयत्याने गळा चिरून अर्चनाची हत्या केली. अर्चनासोबत असलेल्या तिच्या मैत्रिणींनी आरडाओरड सुरू केल्यानंतर आरोपीने घटनास्थळावरून पळ काढला.

# करवीर निवासिनी मंदिरात नवरात्रौत्सवाची जय्यत तयारी

## देवस्थान समितीकडून यंदा दहा दिवस दसरा महोत्सव

सुराज्य/कोल्हापूर



करवीर निवासिनी अंबाबाई मंदिरात नवरात्रौत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. रोज लाखांवर भाविकांची गर्दी होण्याची अपेक्षा असल्याने त्यांना सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीच्यावतीने तयारी करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी राहूल रेखावार व पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित यांनी शुक्रवारी मंदिर परिसराची पाहणी केली. दरम्यान जिल्हा प्रशासनाच्यावतीने यंदा दहा दिवस विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

नवरात्रौत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंदिराची रंगरंगोटी, विद्युत रोषणाई, स्वच्छता पूर्ण झाली आहे. मंदिर परिसरात सीसीटीव्ही लावण्यात आले असून काही ठिकाणी नियंत्रण कक्ष उभारण्यात आले आहेत.

शेतकरी संघाच्या इमारतीत दर्शन रांगेची सोय करण्यात आली आहे. महालक्ष्मी अन्नछत्राच्या वतीने रोज भाविकांना महाप्रसादाची सोय करण्यात आली आहे. मंदिरात रोज धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# शिरपूरच्या पार्श्वनाथ मंदिरात राडा

**वाशिम :** शिरपूरमध्ये जैन समुदायात पुन्हा वाद निर्माण झाला. दिगंबर आणि श्वेतांबर या दोन पंथीयांमध्ये राडा झाला. दर्शन बारीत खुर्च्या, बाकडे लावून अडथळा निर्माण केल्यावरुन हाणामारी झाल्याची घटना घडली. या घटनेत दिगंबर समुदायातील एका महिलेसह दोघे जण जखमी झाले आहेत.

गुरुवारी सकाळी साडेसातच्या सुमारास शिरपूर येथील अंतरिक्ष पार्श्वनाथ मंदिरात दिगंबर व श्वेतांबर समुदायातील भाविक दर्शनासाठी जात होते. दिगंबर समुदायातील अनुयायांच्या म्हणण्यानुसार मंदिरात जाणाऱ्या रस्त्यावर श्वेतांबर समुदायाच्या लोकांनी खुर्च्या ठेवल्यानं मंदिरात दर्शनाला जाण्यासाठी अडचण निर्माण झाली होती. त्यामुळे दोन्ही गटात शाब्दिक चकमक होऊन हाणामारीची घटना घडली.

# अग्नितांडवात 'रोबो' लावणार जिवाची बाजी

**सुराज्य/ठाणे :** जीवघेण्या आगीच्या ज्वाळा...काळ्याकुट्ट धुराचे लोट आणि इमारतींचे तळघर असो वा जिने अशा आव्हानात्मक परिस्थितीतही आग विझवणाऱ्या रोबोचे प्रात्यक्षिक ठाण्याच्या बाळकूम अग्निशमन केंद्रात करण्यात आले.



या अत्याधुनिक रोबोमुळे अग्निशमन दलातील जवानांच्या जीवावर बेतणाऱ्या आगीत सफाईदारपणे व जलदगतीने परिस्थिती नियंत्रणात आणली जाणार आहे. कोटींच्या घरात किंमत असलेल्या या रोबोचे प्राथमिक प्रात्यक्षिक पार पडले असून भविष्यात प्रशासकीय मंजुरी मिळाल्यानंतर हा रोबो ठाणे महापालिकेच्या अग्निशमन दलात सामील होणार आहे. त्यामुळे येत्या काळात अग्नितांडवात 'रोबो' जीवाची बाजी लावून सर्वसामान्यांचे जीव वाचवणार आहे.

# सावकाराचे कर्ज फेडण्यासाठी कुटुंबियांच्या ५ किडन्या विकायला काढल्या

## नांदेडमधील पोस्टर्सची जोरदार चर्चा

सुराज्य/नांदेड


सावकारी कर्जाच्या जाळ्यात अडकल्यानंतर कर्ज फेडण्यासाठी एखाद्याला कोणत्या अडचणींना सामोरं जावं लागत आणि तो किती असहाय होतो, याचा प्रत्यय सध्या नांदेडकरांना पहायला मिळत आहे. सावकारी कर्ज फेडण्यासाठी एका महिलेने चक्क पाच किडनी विकण्यासंदर्भात पोस्टर लावले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या भिंतीवर हे पोस्टर चिकटवण्यात आले आहेत. एवढंच नाही तर सावकाराच्या भीतीने महिला आपल्या कुटुंबियासह दोन वर्षांपासून घर सोडले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या भिंतीवर लावण्यात आलेले हे पोस्टर सर्वांचं लक्ष वेधत आहे.

जिल्ह्यातील मुदखेड तालुक्यातील वाईवरदड येथील महिला शेतकरी सत्यभामा बालाजी कुंचलवार यांनी हे पोस्टर लावले आहे. त्यांच्या कुटुंबात पती, दोन मुले व एक मुलगी, असे त्यांच्यासह पाच सदस्य आहेत. मोठा मुलगा दहावी, दुसरा मुलगा सातवी तर, मुलगी पाचवीपर्यंत शिकले आहेत. वाईवरदड येथे त्यांची सात एकर शेती आहे. मागील तीन वर्षांपूर्वी त्यांनी मुदखेडच्या खासगी सावकाराकडून दोन लाख रूपये कर्ज घेतले होते. दरम्यानच्या काळात त्यांनी काही पैसे फेडले होते. परंतु, कोरोनातील लॉकडाऊन काळात सर्वच ठप्प होते. त्यातच शेतीतूनही फारसे उत्पन्न मिळाले नाही. त्यामुळे घेतलेल्या कर्जाची परतफेड त्या करू शकल्या नाहीत, असे सत्यभामा यांनी सांगितले.







कर्ज फेडत नसल्याने त्यांना सावकाराकडून त्रास दिला जात असून त्यांनी गाव सोडून दिले आहे. तसेच शेती इतरांना करण्यास दिली तर, त्या लोकांनाही सावकराकडून त्रास दिला जात आहे. दरम्यानच्या काळात त्यांच्या एका मुलाला सर्पदंश झाला होता. त्यांनी मुंबईत त्याच्यावर उपचार केले. याच ठिकाणी मोलमजुरी करून पोटभरत आहेत.

सत्यभामा या लोकांची धुणीभांडी करत असून मुलेही छोटी मोठी कामे करतात. त्यांची शिक्षणे थांबली आहेत. तसेच त्यांचे पती बालाजी आठ दिवस चांगले काम करतात. पुढे या घटनेमुळे मानसिक संतुलन बिघडते. त्यांना सावरण्यात बराचसा वेळ जातो, असे सत्यभामा यांनी सांगितले.

### पोस्टरवर काय लिहिले?

पाच किडन्या विकणे आहे, संपर्कासाठी मोबाईल क्रमांक (८२६३०८९८१३) त्या खालोखाल इंग्रजीमध्ये सुध्दा Kidney is to sell असे लिहून पुन्हा इंग्रजी अंकांमध्ये सुध्दा मोबाईल क्रमांक लिहिलेला आहे.

### सावकाराच्या भीतीमुळे गाव सोडले

सावकारचे पैसे देणे आमचे काम आहे. मरण्यापेक्षा एक किडनी विकून व एका किडनीवर जगू. माझ्या मुलांना शिकवायचे आहे. कुटुंबात पाच जण आहे. त्यापैकी ज्यांची किडनी रुग्णाला फिट बसेल ती विकायची आहे. त्या पैशातून सावकाराचे पैसे द्यायचे आहेत. मी, नांदेडला येणार आहे आणि सर्व सविस्तरपणे सांगणार आहे. मला तुम्ही मदत करा. सावकाराच्या भीतीमुळे गाव सोडले असून जीव मुठीत धरून रहात आहे, असे सत्यभामा बालाजी कुंचलवार यांनी सांगितले.

# आ. शहाजीबापू पाटील यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

## शिवसैनिकांसह हितचिंतकांनी दिल्या शुभेच्छा : संपर्क कार्यालयात नेते-कार्यकर्त्यांची मोठी गर्दी





सुराज्य/सांगोला

सांगोला विधानसभा मतदारसंघाचे पाणीदार आमदार शहाजीबापू पाटील यांचा वाढदिवस सांगोल्यातील शिवसेनेसह तमाम बापू प्रेमींनी ढोल, ताशे, हालगीच्या तालात फटाक्याची आतषबाजी करून उत्साहात साजरा करण्यात आला.

सांगोला शहर तालुक्यात विविध समाज उपयोगी उपक्रम राबवून शालेय विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी आ.शहाजी बापू पाटील यांनी संपर्क कार्यालयात स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला शनिवारी दिवसभर सांगोला येथील त्यांच्या संपर्क कार्यालयासमोर सांगोला शहर व तालुक्यातील तसेच पंढरपूर ( भाळवणी) गटातील शिवसेना पदाधिकारी कार्यकर्ते, सर्व पक्षीय नेतेमंडळी , मित्रपरिवार , तमाम बापू प्रेमींनी त्यांना शुभेच्छा देण्यासाठी मोठी गर्दी केली होती.

चिकमहुद येथील निवासस्थानी पत्नी रेखाताई पाटील, माजी सरपंच सुशिला कदम, स्नुषा अपेक्षा पाटील, शोभा कदम,राधिका मगर , प्रिती पाटील ,आक्काताई भोसले तसेच गावातील असंख्य महिलांनी आमदार शहाजी बापू पाटील यांचे औक्षण केले यावेळी ढोल, ताशे, हलग्या वाजवत फटाके वाजवून त्यांच्या घरासमोर पत्नी रेखा पाटील व आमदार शहाजी बापू , पंढरीनाथ भोसले , चिरंजीव दिग्विजय पाटील, नातू शंभूराजे पाटील यांनी केक कापून वाढदिवस साजरा केला.

सांगोला येथील ॲड. उदय घोंगडे यांच्या निवासस्थानी आमदार शहाजी बापू पाटील यांचे माजी नगरसेविका शोभा घोंगडे, ज्योती घोंगडे ,प्राजक्ता घोंगडे यांनी औक्षण केले. यावेळी आनंद घोंगडे, अजिंक्य घोंगडे, दर्शन घोंगडे आदी उपस्थित होते. शहरातील महात्मा फुले चौकात ७० टक्के सवलतीच्या दरात एलईडी टीव्ही, वाटर फिल्टर साहित्य विक्री स्टॉलचे उद्घाटन त्यांच्या हस्ते केले.

### मुख्यमंत्र्यांसह अनेक नेत्यांनी दिल्या शुभेच्छा

मुंबईत शुक्रवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आमदार शहाजी बापू पाटील यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करुन राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या तर शनिवारी सकाळी खासदार श्रीकांत शिंदे,राज्याचे मंत्री शंभूराज देसाई,मंत्री दादा भुसे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार दीपक साळुंखे-पाटील, शिवसेनाप्रणित शेतकरी सेनेचे प्रदेशाध्यक्ष धनंजय पवार, छोटा पुढारी घनश्याम दराडे, मनसेचे दिलीप धोत्रे, ज्येष्ठ नेते बाबुराव गायकवाड, तानाजी पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतन सिंह केदार, उद्योगपती बाळासाहेब एरंडे, माजी नगराध्यक्ष मारुती बनकर, रफिक नदाफ आदी मान्यवरांनी आ.शहाजीबापू यांचा सत्कार करुन शुभेच्छा दिल्या

महूद येथील ग्रामदैवत श्री अंबिका देवीचे आमदार पाटील यांनी दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले. मंदिरात आ.पाटील यांच्या हस्ते वॉटर फिल्टर चे उद्घाटन केले. यावेळी महूद गाव व वाड्या वस्त्यांवरील शालेय विद्यार्थिना खाऊचे वाटप केले. यावेळी संजय मेटकरी, अंगद जाधव, महेंन्द्र बाजारे, संतोष पवार, के टी पवार, यशवंतराव खंबाले,कैलास खबाले, डॉ.शरद नागणे,ओंकार लवटे, काका नागणे, विठ्ठल बागल, अरुण नागणे, उमेश पाटील, सुखदेव चव्हाण, बाळासाहेब पवार, नैनेश कांबळे, भिमराव नागणे, दत्ता येळे,संजय चव्हाण, सद्दाम मुजावर, रमेश रुपनर,धनंजय कांबळे आदींनी बापूंना शुभेच्छा दिल्या. शिवणे ग्रामपंचायत लोकनियुक्त सरपंच दादासाहेब घाडगे ,उपसरपंच उदय घाडगे भीमशक्ती संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजय बनसोडे ,विलास घाडगे, प्रतापराव पाटील आदी मान्यवरांनी फेटा बांधून श्रीफळ देऊन सत्कार केला

दिवसभर सांगोल्यात त्यांच्या संपर्क कार्यालयात राष्ट्रवादीचे ॲड. दीपक पवार, विधानसभा प्रमुख प्रा, संजय देशमुख, ॲड. विश्वासराव गायकवाड,शिवसेना उपजिल्हाप्रमुख जगदीश पाटील, जिल्हा संपर्कप्रमुख सागर पाटील, तालुकाप्रमुख दादासाहेब लवटे, शहर प्रमुख समीर पाटील, युवा सेना तालुकाप्रमुख गुंडा खटकाळे, माजी नगरसेवक सोमेश यावलकर, रिपाइं तालुकाध्यक्ष खंडू सातपुते, किर्तीपाल बनसोडे, पंचायत समितीचे माजी सदस्य सुभाष इंगोले, पांडुरंग मिसाळ, बिरापंच आलदर, बाबासाहेब पाटील, विलास व्हनमाने, उद्योजक किरण पांढरे, भागवत तंडे, सौदागर केदार, योगेश खटकाळे, श्रीनिवास करे, सोमा ठोकळे, अभिजीत नलवडे,अनिल मोटे, विष्णुपंत केदार, बाळासाहेब आसबे, महादेव पाटील, अजिंक्य शिंदे, शाहू मेटकरी, संतोष देवकाते, बाळासाहेब झपके, बाळासाहेब बनसोडे, उल्हास धायगुडे, अमोल खरात, धनंजय काळे ,सचिन काळे, डॉ् दादा जगताप, राजेंद्र मेटकरी, लक्ष्मण भोसले, नवनाथ येडगे तसेच शहरातील मुस्लिम समाजाचे हाजी शब्बीर भाई खतीब, दिलावर तांबोळी,युसूफ मुल्ला, उस्मान इनामदार,इसाक तांबोळी,रौऊफ तांबोळी,मगबूल मुल्ला, निसार मुलाणी, अय्याज मणेरी, खलील मनेरी महेबुब मणेरी यांच्यासह परीट समाज, नाभिक समाज, गोंधळी समाज,होलार समाज,रामोशी समाज बांधव, विविध सामाजिक, राजकीय संघटना, पत्रकार संघटनेच्या वतीने आ.शहाजीबापू पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

## दुर्गामाता व्यापारी मंडळातर्फे विविध उपक्रमांचे आयोजन

सुराज्य/सोलापूर



कस्तुरबा मार्केट परिसरातील दुर्गामाता व्यापारी मंडळ ट्रस्ट यंदा ५० व्या वर्षात पदार्पण करत असून, त्यानिमित्त यंदाच्या या सुवर्ण महोत्सवीवर्षात विविध उपक्रम साजरा करण्यात येणार असल्याची माहिती ट्रस्ट अध्यक्ष केदार दामा यांनी पत्रकार परिषदेत दिली.


सन १९७४ मध्ये कस्तुरबा मंडई परिसरात शंकरराव मुधोळकर, मल्लिनाथ गिराम, मच्छिंद्र परबळकर, महादेव गोटे, शिवकुमार दामा, भिमाशंकर गळोरगी, पंचप्पा किणगी यांनी या ट्रस्टची स्थापना केली. दि. १५ रोजी भव्य लेझीमच्या ताफ्याने मिरवणूक काढून मुर्तीची प्रतिष्ठापना करून घटस्थापना होणार आहे. दि. १६ रोजी नक्षत्र आरती करून महापुजेस प्रारंभ होईल. दि. १७ रोजी सायंकाळी ७ वा. शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या शिवराज्याभिषेक सोहळ्याचे औचित्य साधून सुप्रसिध्द शिव व्याख्याते डॉ. शिवरत्न शेटे यांचे चला संस्कार घडवू या विषयावर व्याख्यान होणार आहे. यंदाच्या नवरात्रोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे डेहराडून येथील तपकेश्वर महादेवाची गुफा. याचा देखावा करण्यात येणार आहे. त्याचे उद्घाटन दि.१८ रोजी करण्यात येणार आहे. दि.१९ रोजी सायंकाळी ४ ते ६ यावेळेत कुंकुमार्चना. दि. २० रोजी कुमारीका पूजन. दि. २१ रोजी श्रीसुक्तपठण. रविवार दि. २२ रोजी पहाटे ६ ते ८ या वेळेत होमहवन, ६ वा.दिपोत्सव. दि. २३ रोजी सायंकाळी ६ ते ८ या वेळेत भजन संध्या. मंगळवार दि.२४ रोजी वियादशमी दिवशी भव्य मिरवणूक मध्यवर्ती मार्गावरून निघणार आहे. या मिरवणुकीत शिवकालीन पारंपारिक वाद्ये सामिल करून वाजवण्यात येणार आहेत. सिमोल्लंघनाने मिरवणुकीची सांगता होईल. दरवर्षी मंडळाच्या माध्यमातून ग्रामदैवत श्री सिध्देश्वर महाराजांच्या नंदिध्वजाची महापूजा करून महाप्रसादाचे वाटप करण्यात येते.

## छत्रपती शिवाजी-संभाजी महाराज चौक रस्ता होणार

### अखेर प्रशासनाला आली जाग : चौकातही ३ ठिकाणी होणार सुशोभीकरण

सुराज्य/सोलापूर

अनेक वर्षांपासून रस्ते महामार्ग प्राधिकरण आणि सोलापूर महापालिका प्रशासनाच्या लाल फितीत अडकलेला व अतिशय दुर्दशा झालेला, शहरात प्रवेश करण्याचा प्रमुख असा रस्ता, छत्रपती संभाजी महाराज चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक हा रस्ता नवीन तयार करण्यासाठी सोलापूर महापालिका प्रशासनाकडून निविदा प्रक्रियेअंती मक्तेदारास कामाचा मक्ता देण्यात आला आहे.



हा रस्ता नव्याने तयार करण्यासाठी २ कोटी ४३ लाख रुपयांच्या कामाचा मक्ता रस्ते काम करणाऱ्या मक्तेदारास दिला.

याबरोबरच या चौकात ३ ठिकाणी सुशोभीकरणदेखील करण्यात येणार आहे. रस्ते वाहतूक महामार्ग आणि सोलापूर महापालिका प्रशासनाच्या टोलवाटोलवीमध्ये अडकलेला हा रस्ता नव्याने तयार होण्याचा मार्ग सुकर झाल्यामुळे सोलापूरकरांनी महापालिका प्रशासनास उशिरा का होईना जागा आल्याचे सांगत समाधान व्यक्त केले आहे.

## तंबाखूची बेकायदेशीर वाहतूक; गुन्हा दाखल

सोलापूर : राज्यात प्रतिबंध असलेला सुगंधी पान मसाला तंबाखूची बेकायदेशीर वाहतूक करताना आढळल्याने सलीम मौलाली करणकोट (वय-४३,रा.सागर चौक,जुना विडी घरकुल, सोलापूर) याच्या विरोधात अन्न औषध व प्रशासन विभागाचे सहाय्यक आयुक्त रेणुका पाटील यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

सलीम करणकोट हे ऑटो रिक्षा क्र.एमएच.१३.बीवी.१९५४ मधून पान मसाला सुगंधी तंबाखू घेऊन स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी वाहतूक करताना आढळल्याने शांती चौक ते अशोक चौकाकडे जाणाऱ्या रोडवर त्यांना पकडले. तपास पोलीस निरीक्षक बादोले हे करत आहेत.



सोलापूर : शनिवारी भारत-पाकिस्तान यांच्यात विश्वचषकातील सामना झाला. क्रिकेटच्या चाहत्यांनी हा रंगतदार सामना पाहण्यासाठी बाजारपेठेतील टीव्हीच्या शोरुममध्ये गर्दी केली होती.

## दारुड्या रुग्णाची डॉक्टरला मारहाण



सोलापूर : पिण्यासाठी दारू न मिळाल्याने कावरा बावरा झालेल्या एका रुग्णाने दवाखान्यातील डॉक्टराला सलाईनच्या स्टँडने मारल्याची घटना सिव्हिल हॉस्पिटल येथील ए ब्लॉक मेल वार्ड मध्ये शुक्रवारी रात्री घडली.

डॉक्टर अश्विन संजय पुंड (वय २७ वर्ष, रा पीजी होस्टेल, सिव्हिल हॉस्पिटल, सोलापूर) असे त्या डॉक्टरचे नाव आहे. शुक्रवारी रात्री साडेदहा वाजता अश्विनी पुंड हे ए ब्लॉक मेल वार्डमध्ये बिलिंग करण्यास गेले होते. त्या ठिकाणी उपचारार्थ दाखल असलेला रुग्ण अजित जाधव यांनी दारू न मिळाल्याच्या कारणावरून अचानक डॉ अश्विन पुंड यांना सलाईनच्या स्टॅन्ड ने मारले. त्यामुळे हाताला मुका मार लागला. डॉक्टर स्वतः उपचाराकरिता सिव्हिलमधील तातडीच्या सेवा विभागात दाखल झाले.

याबाबत सिव्हिल पोलीस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## अवघ्या सहा महिन्यातच मंत्रीचंडक इस्टेटमधील रस्त्याची दैना !

### पालिका आयुक्तांनी दिले चौकशी, कारवाईचे आदेश

सुराज्य/सोलापूर

होटगी रोडवरील मंत्रीचंडक इस्टेटमधील रस्ता अवघ्या सहा महिन्यातच उखडला आहे. मंत्रीचंडक इस्टेटमधील दैना झालेल्या रस्त्याच्या चौकशीसह कारवाईचे आदेश महापालिका आयुक्तांनी दिले आहेत.

सोलापूर शहरात विविध भागात विशेषता हद्दवाढ भागांमध्ये महापालिकेच्या भांडवली, वॉर्डवाईज आणि शासनाच्या विविध योजनांमधून अनेक कामे झाली. मात्र यामधील अनेक कामे विशेषता रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची होऊन अवघ्या सहा महिने वर्षभरातच रस्ते उखडून आणि पाण्यात रस्ताच वाहून गेल्याच्या तक्रारी महापालिकेकडे मोठ्या प्रमाणात प्राप्त झाल्या आहेत.

दरम्यान, सहा महिन्यात डांबरी रस्ता खराब झाल्याने महापालिकेने हा रस्ता पुन्हा एकदा करावा आणि संबंधित मक्तेदारावर कडक कारवाई करावी, या मागणीचे निवेदन होटगी रस्त्यावरील मंत्रीचंडक इस्टेटमधील नागरिकांनी आयुक्तांना दिले.

तत्कालीन आयुक्त पी. शिवशंकर यांच्या हस्ते मंत्रीचंडक इस्टेटमधील या रस्त्याचे उद्घाटन झाले होते. याच रस्त्याची अवघ्या सहा महिन्यातच दयनीय अवस्था झाल्याची माहिती नागरिकांनी आयुक्तांना दिली. आयुक्त शीतल तेली- उगले यांनी या रस्त्याच्या कामाची सखोल चौकशी करण्याचे आणि संबंधित मक्तेदारावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.



महापालिकेच्या प्रभाग क्रमांक-२१ मधील होटगी रोड परिसरातील किल्लेदार मंगल कार्यालय ते मंत्रीचंडक इस्टेट ते बिराजदार घरापर्यंतचा डांबरी रस्ता आणि याला जोडूनच असलेला मंत्रीचंडक इस्टेट बिराजदार घर ते एस. बी. पीस कॉम्प्लेक्स पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे या कामासाठी प्रभागातील नगरसेविका तसलीम शेख यांनी आपल्या भांडवली निधीतून ९ लाखांचा निधी दिला होता. महापालिकेने या कामाचा मक्ता मक्तेदार सचिन असापुरे यांना दिला होता. तर हे काम झोन क्रमांक-५ चे विभागीय अधिकाऱ्यांच्या देखरेखी खाली पूर्ण झाले. गतवर्षाचा पावसाळा होऊन जाण्यासाठी मक्तेदारांनी वर्क ऑर्डर दिल्यानंतर हे कामच उशिरा सुरू केले.

चालू वर्षात झालेले हे काम यंदाच्या पावसाळ्यात अवघ्या सहा महिन्यातच पूर्णपणे उखडून गेल्याची तक्रार नागरिकांनी आयुक्तांसमोर केली. लागलीच आयुक्तांनी नगर अभियंता कार्यालय आणि रस्ते विभागाला या कामाच्या चौकशीचे आणि त्याचे अहवाल देण्याचे आदेश दिले आहेत. यासंदर्भातील अहवाल येताच कारवाई करण्यात येणार आहे.

## बनावट दस्त करून जमीन हडपण्याचा प्रकार; चौघांवर गुन्हा

सोलापूर : दुय्यम निबंधक कार्यालय वर्ग २ सोलापूर उत्तर येथील कार्यालयात दोन तोतया व्यक्तींना उभे करून खोटे व बनावट खरेदीखत करत शेतजमीन विकल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी चौघांविरोधात सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दत्तात्रय मोरे (वय-६२,रा.गणेशनगर,मडकी वस्ती) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार मारूती पवार (रा.बीबीदारफळ),अशोक गुलाब मोरे, श्रीकांत मोरे, सुनील दत्तात्रय यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दत्तात्रय मोरे व मुलगा विकास यांनी तलाठी कार्यालयातून सातबारा व तहसील कार्यालयातून फेरफार काढले होते. तेव्हा त्यांना खरेदी दस्त २१९३ / २००३ बीबीदारफळ येथील फिर्यादी व फिर्यादीचा भाऊ शहाजी व अशोक यांचे मालकीची शेजजमीन आहे.पुढील तपास पोसई लोंढे हे करीत आहेत.

### जेलरोड हद्दीतून कार,मोटरसायकल गायब

सोलापूर : मोटर सायकल चोरीच्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढत होत आहे.जेलरोड पोलीस ठाण्याचे हद्दीत बुधवारी कार व मोटरसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेण्याची घटना घडली आहे.राजाराम सिद्राम दिवसानी (रा.सत्य लक्ष्मी अपार्टमेंट,सोलापूर) यांनी आपल्या घरासमोर पार्क करून ठेवलेली अडीच लाख रुपये किमतीची पांढरा रंगाची कार चोरून नेली तर दुसऱ्या घटनेत प्रकाश मल्लय्या भंडारी (रा. ऋषी अपार्टमेंट,हनुमान मंदिर समोर,सोलापूर) यांची ४० हजार रुपये किमतीची फॅशन मोटरसायकल ही घरासमोरून चोरून नेली.दोन्ही घटनेची नोंद जेलरोड पोलीस ठाण्यात झाली असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.




## उजनीच्या कालव्यातून पाणी सोडण्याच्या मागणीसाठी उपोषण

सुराज्य/पंढरपूर

पंढरपूर तालुक्यातील करकंब व परिसरात पावसाअभावी पाणीटंचाई जाणवू लागली आहे. या पार्श्वभूमीवर उजनीच्या कालव्यातून पाणी सोडण्याच्या मागणीसाठी माजी ग्रा.पं.सदस्य सचिन शिंदे यांनी करकंब - नेमतवाडी रोडवर असलेल्या उजनीच्या डाव्या कालव्यावर उपोषण सुरू केले आहे.

करकंब व परिसरावर पावसाळा संपत आला तरी विहिरी, बोअरवेल आटू लागल्या आहेत. अशातच करकंबच्या पाणी पुरवठयाचे प्रमुख साधन असलेल्या डाव्या कालव्या लगत पाच एकर क्षेत्रात असलेला पाणी साठवण तलाव मागील एक महिन्यापासून कोरडा पडला आहे. करकंबकरांवर पाणीटंचाईचे संकट आहे. पाण्याची टंचाई दिवसेंदिवस वाढत चालली असल्याने पाणी सोडण्याचा निर्णय जोपर्यंत होत नाही तोपर्यंत उपोषण सुरूच ठेवण्याचा निर्णय आरपीआय, धाडस सामाजिक संघटना, दलित महासंघ, प्रहार अपंग क्रांती आंदोलन संघटना, महाराष्ट्र विकास सेना, अहिल्या फाउंडेशन, करकंब, सरपंच परिषद मुंबई, महाराष्ट्र, संभाजी ब्रिगेड, आम आदमी, मनसे आदी संघटनांनी घेतला आहे.

यावेळी उपसरपंच आदिनाथ देशमुख, सरपंच प्रतिनिधी शरदचंद्र पांढरे, तंटामुक्ती अध्यक्ष अमोल शेळके, प्रा.सतीश देशमुख, अर्जुन शेटे, सुरेश शिंदे, राजू शिंदे, विजय नलवडे, राहुल शिंगटे, बाळासाहेब गुळमे, भीमराव मदने, सावता खारे, विजय शेटे, दिलीप व्यवहारे, ज्योतिराम मदने, सुरय्या आतार, सुनीता देशपांडे उपस्थित होते.